POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण

बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२९० ● मुंबई, शनिवार, २३ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

परीक्षेच्या नादात विद्यार्थ्याने गमावल्या दोन्ही किडनी
आजीने वाचवला जीव, पण पुढे जे घडलं...

वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचं स्वप्न उराशी बाळगून नीट परीक्षेसाठी कठोर परिश्रम घेणारे विद्यार्थी लातूरमध्ये मोठ्या प्रमाणात आहेत. मात्र, याच नीट परीक्षेच्या व्यवस्थेने एका गुणवंत विद्यार्थ्याचे आयुष्य पणाला लावले आहे. तहान-भूक हरवून सलग ३ वर्षे नीटची तयारी करणाऱ्या लातूरच्या विश्वजित तेलंगे या विद्यार्थ्याला आपल्या दोन्ही किडनी गमवाव्या लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एकीकडे आरोग्य धोक्यात आले असताना, दुसरीकडे लागोपाठ झालेल्या पेपरफुटीमुळे विश्वजित आणि त्याचे कुटुंबीय पूर्णपणे हताश झाले आहेत.

८ ते १० तास अभ्यास, पण नशिबात फक्त नैराश्य

विश्वजितने डॉक्टर होण्यासाठी दिवस-रात्र एक केले होते. तो रोज ८ ते १० तास कठोर अभ्यास करायचा. अशापद्धतीने अभ्यास करुन त्याने परीक्षेची तयारी केली होती. मात्र, या प्रचंड मानसिक आणि शारीरिक ताणामुळे त्याच्या आरोग्यावर गंभीर परिणाम झाला. त्याला आपल्या दोन्ही किडनी गमवाव्या लागल्या. विश्वजितची ही अवस्था पाहून अखेर त्याच्या आजीने त्याला किडनी दान केली. गेल्या वर्षभरापासून रुग्णालयात उपचार घेतल्यानंतर तो नुकताच लातूरला परतला आहे.

तीनवेळा परीक्षा दिली, तिन्ही वेळा पेपर फुटला!

विश्वजितचे दुर्दैव एवढ्यावरच थांबले नाही. त्याने आजारपणाशी लढा देत सलग तीन वेळा नीटची परीक्षा दिली. मात्र, प्रत्येक वेळी पेपर फुटल्याची बातमी समोर आली. यावषीर्ही प्रकृती ठीक नसताना त्याने परीक्षा दिली, पण पुन्हा एकदा पेपरफुटीचेच सत्र पाहायला मिळाले. "आम्ही रक्ताचं पाणी करून अभ्यास करतो, शरीर पणाला लावतो. मात्र, काही लोक पैसे देऊन पेपर फोडतात आणि डॉक्टर बनतात. मग आमच्यासारख्या प्रामाणिक कष्ट करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नशिबी फक्त अपयश आणि नैराश्य का?" असा सवाल विश्वजित आणि त्याच्या वडिलांनी केला.

थेट घराशेजारी पोहोचला सीबीआय तपासाचा धागा

दरम्यान लातूर हे नीट पेपरफुटी घोटाळ्याचे मुख्य केंद्र असल्याचा संशय आता अधिक बळावला आहे. कारण, विश्वजित आणि त्याचे कुटुंबिय ज्या भागात राहतात, अगदी तिथपर्यंत आता या पेपरफुटीचा तपास पोहोचला आहे. विश्वजितच्या घराच्या शेजारीच राहणाऱ्या एका कुटुंबाची केंद्रीय अन्वेषण विभागाने थेट चौकशी केली आहे. या कारवाईमुळे लातूरमधील पेपरफुटीचे रॅकेट किती खोलवर पसरले आहे, हे स्पष्ट होत असून संपूर्ण परिसरात खळबळ माजली आहे.

मोटेगावकरनंतर आता नवा डॉक्टर रडारवर
नीट प्रकरणात सीबीआयची मोठी कारवाई



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

नीट पेपरफुटी प्रकरणात रोज नवनवे खुलासे होत आहेत. या प्रकरणाचा तपास सीबीआयतर्फे केला जात आहे. सध्या लातूरमधील आरसीसी क्लासेसचा प्रमुख मोटेगावकर सीबीआयच्या ताब्यात आहे. मोटेगावकरच्या अटकेनंतर नीट पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोर लातूरपासून ते अंबाजोगाईपर्यंत असल्याचे समोर आले आहे. दरम्यान, सीबीआयच्या तपासाला वेग आला असून लातूरमधीलच डॉ मनोज शिरूरे याच्यानंतर आता आणखी एका डॉक्टरच्या घरी कसून चौकशी करण्यात आली आहे. या चौकशीत सीबीआयच्या हाती महत्त्वाचे धागेदोरे लागले असून धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

आणखी एक डॉक्टर चौकशीसाठी ताब्यात

मिळालेल्या माहितीनुसार लातूरमध्ये सीबीआयने ताब्यात घेतलेल्या डॉ.मनोज शिरुरे याचे हॉस्पिटल, घर आणि घरा शेजारच्या एका अपार्टमेंटमध्ये चार तास कसून चौकशी केली आहे. या दरम्यान अनेक महत्त्वाचे धागेदोरे सीबीआयच्या हाती लागले आहेत. अंबाजोगाईमध्ये दोन विद्यार्थ्यांची चौकशी केल्यानंतर सीबीआयचे पथक थेट लातूरमध्ये डॉ मनोज शिरूरे याच्या घरी पोहचले होते. शिरुरेनंतर आता या नीट गैरव्यवहार प्रकरणात आणखी एका डॉक्टरला सीबीआय चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. हा डॉक्टर शिरूरे यांचा नातेवाईक असल्याचे सांगण्यात येत आहे. या संशयित डॉक्टरच्या घरी सीबीआयने चौकशी करीत काही महत्त्वाचे दस्तावेज ताब्यात घेतले आहेत. त्यामुळे लातूरमधून पी व्ही कुलकर्णी, मोटेगावकर, डॉ मनोज शिरूरे आणि आता आणखी एका डॉक्टरचे नाव पेपर फुटीप्रकरणात समोर आले आहे.

लातूरमध्ये सीबीआयची ये-जा सुरूच

लातूर आणि अंबाजोगाईमध्ये नीट प्रकरणी सीबीआयने याआधीच चौकशी केली आहे. अंबाजोगाई इथं दोन विद्यार्थ्यार्ची चौकशी करण्यात आली आहे तर लातूरमध्ये दोन डॉक्टरांच्या घरी चौकशी करीत सीबीआयच्या पथकाने माहिती मिळवली आहे. लातूरमध्ये सीबीआयच्या अधिकाऱ्यांची ये-जा सुरूच आहे. सीबीआयचे वेगवगेळे अधिकारी तपास करीत आहेत. या तपासात स्थानिक पोलिसांचीही मदत घेतली जात आहे. त्यामुळे आगामी काळात या नीट पेपरफुटी प्रकरणात नेमकी कोणती माहिती समोर येणार, हे पाहणे मत्त्वाचे ठरणारे आहे.

नाव नोंदणीसाठी अधिकारी आल्यावर काय कराल?
निवडणूक आयोगाने सांगितल्या चार गोष्टी... नोंद करून ठेवा





■मुंबई । प्रतिनिधी,

राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषदत घेत स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हीजन मोहिमेची माहिती दिली आहे. तुमचे नाव मतदार यादीत आहे की नाही हे पाहणे सोपे आहे. तुम्ही कुठेही असला तरी चालेल. तुमचे मतदार यादीत नाव तुम्हाला पाहाता येईल. निवडणूक आयोगाने वेबसाईटमध्ये संपूर्ण देशाच्या राज्यांची यादी दिली आहे. राज्य, जिल्हा निवडून बघा. तुम्ही कोणत्या भागात मतदान केले हे तुम्हाला जर माहीत नसेल,पण तुमच्या मतदारसंघाचे नाव आठवत असेल तर तुमचे नाव टाकून शोधलं तर तुमचं नाव तुम्हाला मिळेल असे राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हीजन मोहिमेसाठी तुमच्या घरी नाव नोंदणीसाठी जेव्हा अधिकारी आल्यानंतर काय करायचे ते स्टेप वाईज पाहूयात...

स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन अंतर्गत मतदार गणना फॉर्म भरणे आणि सबमिट करणे आता पूर्णपणे ऑनलाईन केलेले आहे. घरी बीएलओ येणार त्यावेळी नेमके काय करावे याची माहिती आज राज्य निवडणूक आयोगाने दिली आहे.

तुम्ही आज कुठेही असेल तरी चालेल. तुमचं मतदार यादीत नाव येईल. निवडणूक आयोगाने वेबसाईटमध्ये पूर्ण देशाच्या राज्याची यादी दिली आहे. वेबसाईटमध्ये तुमचं राज्य, जिल्हा निवडून बघा. तुम्ही कोणत्या भागात मतदान केलं हे तुम्ही माहीत नसेल. पण तुमचा मतदारसंघाचं नाव आठवत असेल तर तुमचं नाव टाकून शोधलं तर तुमचं नाव मिळेल असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

तुम्ही कोणत्या राज्यातील आणि कोणत्या मतदारसंघात मतदान केले होते हे सांगितलं तर तुमचं नाव शोधता येईल. त्यामुळे ती नावे अधिकाऱ्यांना द्या. संगणकातून तुम्ही शोधत आणि काढत असाल तर आम्हाला मदत करण्यासाठी तुम्ही निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर जा आणि तर तुमचं राज्य, मतदारसंघ, जिल्हा आणि बुथ तसेच सीरिअल नंबर शोधून काढले तर आम्हाला ते बरं पडेल असे राज्य निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

एसआयआरला संदर्भात लोकांमध्ये गोंधळ आहे. या मोहिमेंतर्गत ३० जूनपर्यंत तुमच्या घरी बीएलओ येतील. तुमच्याकडे माहिती मिळाली नाही तर निवडणूक आयोगाने ११ सर्टिफिकेट सांगितलेली आहेत. त्यातील एक सर्टिफिकेट दाखवावे. तुम्ही नागरिक असल्याचे आणि जन्म ८७ पूर्वी जन्म झाल्याचा पुरावा द्या. काय सर्टिफिकेट एड करायचं ते सांगा. ११ सर्टिफिकेट आखून दिलेली आहेत. त्या व्यतिरिक्त सर्टिफिकेट असेल तर कळवा. मॅपिंग असेल तर कागदपत्रे देण्याची गरज नाही. मॅपिंग नसेल तर कागदपत्रे द्यावी लागतील. ११ पैकी एक डॉक्यूमेंट दाखवायचं आहे असेही राज्य निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

एखाद्याचं नाव २०११ मध्ये असेल पण त्याचं आडनाव जुळत नसेल. ते डिस्क्रिपन्सीत येतं. तसं असेल तर संबंधित कागदपत्रे दिले पाहिजे. उदा. लग्नानंतर नाव बदललं असेल तर लग्न पत्रिका दाखवावी. हा पुरेसा पुरावा आहे असेही ते म्हणाले.

एक महिना कोणी आपल्या गावात नसेल तर त्याच्या कुटुंबातील कोणीही सही करू शकते. समजा महिनाभर नसाल तर ड्राफ्ट प्रसिद्ध केल्यावर फॉर्म नंबर ६ भरून द्यायचा आहे. डिक्लेरेशन द्यायचे आहे. १ महिन्यात तुम्ही नोंदणी करा. पण ड्राफ्ट यादीत तुमचं नाव नसेल तर तुमचा हक्क जात नाही अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.


सर्व राजकीय पक्षांना सांगितलेले आहे. आमच्या बीएलओसोबत मदत करण्यासाठी पारदर्शकता ठेवण्यासाठी माणसं द्यायला सांगितले आहे. १ लाख १३ हजार बीएलओ सर्व पार्टी मिळून आहेत. काही पक्षांनी ६० हजार नेमले आणि काहींनी ३० हजार नेमले आहेत असेही त्यांनी सांगितले.

लासलगावमध्ये सोमवारपासून कांदा आणि धान्य लिलाव बेमुदत बंद राहण्याची शक्यता

■नाशिक। प्रतिनिधी,

आशिया खंडातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोमवारपासून कांदा आणि धान्याचे लिलाव बेमुदत बंद राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे... आधीच घसरलेले कांद्याचे दर, निर्यात ठप्प आणि वाढत्या उष्णतेमुळे कांदा खराब होत असताना आता लिलाव बंदच्या निर्णयामुळे कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

लासलगाव बाजार समितीत दररोज हजारो क्विंटल कांद्याची आवक होत असते. मात्र आता सोमवारपासून कांदा आणि धान्य लिलाव बेमुदत बंद राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. व्यापारी असोसिएशनने बाजार समिती प्रशासनाला पत्र देत लिलाव प्रक्रियेत सहभागी होणार नसल्याचं स्पष्ट केलं आहे. या निर्णयामागे इंधन तुटवडा हे मुख्य कारण असल्याचं व्यापाऱ्यांनी म्हटलं आहेत.



राज्यात आणि परराज्यात डिझेलची कमतरता जाणवत असल्यानं शेतीमाल वाहतुकीसाठी ट्रक मिळत नसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळं कांदा आणि धान्याची खरेदी करून माल बाहेर पाठवणं अशक्य होत असल्याचं व्यापाऱ्यांचं म्हणणं आहे.

आधीच कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळं कांद्याच्या निर्यातीवर परिणाम झाला आहे. तर दुसरीकडे गेल्या 1 ते दीड वर्षांपासून बांगलादेशमध्ये कांदा निर्यात ठप्प असल्यानं बाजारात कांद्याची मागणी घटली आहे. त्यामुळं लासलगाव बाजार समितीमध्ये कांद्याचे सरासरी बाजारभाव 6 ते 10 रुपये किलोपर्यंत खाली आले आहेत. उत्पादन खर्चही निघत नसल्यानं शेतकरी आर्थिक अडचणीत सापडलाय...त्यातच उष्णतेच्या लाटेमुळे मोठ्या प्रमाणात कांदा खराब होत असल्यानं शेतकऱ्यांचं नुकसान आणखी वाढलं आहे.

दरम्यान, लिलाव बंदच्या निर्णयामुळे हजारो कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे. सरकारनं तातडीनं इंधन पुरवठा सुरळीत करून कांदा वाहतुकीसाठी पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी आता शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

अमली पदार्थांच्या तस्करीप्रकरणी चार साथीदार दोषी... प्रमुख पुरवठादाराला 15 वर्षांच्या कारावासाची शिक्षा





■मुंबई। प्रतिनिधी,

नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो ने मुंबई आणि आसपासच्या परिसरात सिंथेटिक अमली पदार्थांचे मोठे जाळे चालवणाऱ्या एका टोळीविरुद्ध मोठा कायदेशीर विजय मिळवला आहे. ठाण्यातील विशेष एनडीपीएस न्यायालयाने, ह्यमेफेड्रोनह्ण आणि 'मेथॅम्फेटामाइन' सारख्या घातक अमली पदार्थांच्या तस्करीशी संबंधित एका प्रकरणात पाच आरोपींना दोषी ठरवले असून, प्रत्येकाला वेगवेगळ्या कालावधीची शिक्षा सुनावली आहे. या संपूर्ण जाळ्याचा सूत्रधार असलेल्या मोहम्मद आरिफ याकूब भुजवाला याला न्यायालयाने 15 वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली असून 2 लाख रुपयांचा दंडही लावला आहे. याव्यतिरिक्त, परवेझ खान उर्फ 'चिंकू पठाण', मोहम्मद सलमान खान आणि विक्रांत जैन या प्रत्येकाला 5 वर्षांच्या कारावासाची शिक्षा आणि 50,000 रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. दरम्यान, हारिस फैजुल्ला खान याला एक वषार्चा कारावास आणि 10,000 रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

एनसीबीच्या माहितीनुसार, सदर प्रकरण केवळ अमली पदार्थांच्या खरेदी-विक्रीपुरते मर्यादित नव्हते, तर यामध्ये सिंथेटिक अमली पदार्थ बनवण्यासाठी वापरली जाणारी रसायने, बेकायदेशीर शस्त्रे, 'हवाला' पद्धतीद्वारे केले जाणारे आर्थिक व्यवहार आणि अमली पदार्थांच्या विक्रीतून कमावलेल्या पैशातून खरेदी केलेली मालमत्ता, अशा अनेक बाबींचा समावेश असलेले एक मोठे रॅकेट कार्यरत होते. तपास यंत्रणेने या टोळीशी संबंधित 6.5 कोटी रुपयांहून अधिक किमतीची जंगम आणि स्थावर मालमत्ताही जप्त केली आहे. या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात जानेवारी 2021 मध्ये झाली, जेव्हा एनसीबी मुंबईला अशी गुप्त माहिती मिळाली की, नवी मुंबईतील घणसोली परिसरात अमली पदार्थांचा एक मोठा साठा (कन्साइनमेंट) पोहोचवला जाणार आहे. या माहितीच्या आधारे, एनसीबीच्या पथकाने छापा टाकला आणि परवेझ नासिरुल्ला खान उर्फ 'चिंकू पठाण' याला अटक केली. त्यानंतर करण्यात आलेल्या झडतीदरम्यान, अधिकाऱ्यांना त्याच्या ताब्यातून 52.2 ग्रॅम मेफेड्रोन, एक बेकायदेशीर पिस्तूल आणि पाच जिवंत काडतुसे सापडली. याव्यतिरिक्त, 12,500 रुपये रोख रक्कम आणि अंदाजे 3.57 लाख रुपये किमतीचे सोने-चांदीचे दागिनेही जप्त करण्यात आले.

हे दागिने अमली पदार्थांच्या व्यापारातून मिळालेल्या पैशातूनच खरेदी करण्यात आले असावेत, असा संशय तपास यंत्रणेला होता. चौकशीदरम्यान, चिंकू पठाणने अनेक महत्त्वपूर्ण खुलासे केले. त्याने उघड केले की, मुंबईच्या चिंचबंदर परिसरातून कार्यरत असलेल्या एका जाळ्यामार्फत (नेटवर्कमार्फत) त्याला अंमली पदार्थांचा पुरवठा केला जात असे. या माहितीच्या आधारे, एनसीबीने मुख्य आरोपी मोहम्मद आरिफ भुजवाला याच्या मालकीच्या अनेक अड्ड्यांवर छापे टाकले.

चिंचबंदर येथील 'नूर मंझिल' इमारतीत एनसीबीने पाच वर्षांपूर्वी राबवलेल्या मोहिमेदरम्यान, मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ आणि रसायने जप्त करण्यात आली. या ठिकाणावरून 5.375 किलोग्राम 'मेफेड्रोन', 990 ग्रॅम 'मेथॅम्फेटामाइन' आणि 6.126 किलोग्राम 'एफेड्रिन' हे रसायन जप्त करण्यात आले. 'एफेड्रिन'चा वापर कृत्रिम अमली पदार्थांच्या निर्मितीमध्ये केला जातो. याच अड्ड्यावरून एक बेकायदेशीर अग्निशस्त्र आणि 2,18,25,600 रुपयांची रोकडही जप्त करण्यात आली. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, या जागेचा वापर अंमली पदार्थ लपवण्यासाठी, त्यांची पॅकेजिंग करण्यासाठी आणि वितरणासाठी केला जात असे. घटनास्थळावरून इलेक्ट्रॉनिक वजन काटे, सीलिंग मशीन्स, अंमली पदार्थांच्या पॅकेजिंगचे साहित्य आणि अनेक डिजिटल उपकरणेही जप्त करण्यात आली. एनसीबीने बँक खाती आणि आर्थिक व्यवहारांशी संबंधित कागदपत्रेही ताब्यात घेतली. या कागदपत्रांची नंतर सखोल तपासणी करून या नेटवर्कच्या आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेण्यात आला.

तपास जसजसा पुढे सरकला, तसतसे मोहम्मद सलमान खान याची भूमिकाही समोर आली. एनसीबीच्या माहितीनुसार, त्याने 'चिंकू पठाण' याच्याकडून अंमली पदार्थ मिळवले आणि स्थानिक पातळीवर त्यांचे वितरण केले. त्याच्या अड्ड्यावरून 10.5 ग्रॅम 'मेफेड्रोन', पॅकेजिंगचे साहित्य आणि एक वजन काटा जप्त करण्यात आला. दरम्यान, भिवंडीचा रहिवासी असलेल्या विक्रांत जैन उर्फ 'विकी जैन' याच्याकडून 52.8 ग्रॅम 'मेफेड्रोन' जप्त करण्यात आले. त्याने हे अंमली पदार्थ 'रजनीगंधा' आणि तंबाखूच्या पाकिटांमध्ये लपवून ठेवले होते. तपासात पुढे असेही उघड झाले की, तो या व्यवसायात एक गुंतवणूकदार म्हणून सहभागी होता.

याव्यतिरिक्त, वांद्रे येथे अटक करण्यात आलेल्या हारिस फैजुल्ला खान याच्याकडून 3 ग्रॅम 'मेफेड्रोन' जप्त करण्यात आले. एनसीबीने या प्रकरणातील आपली कारवाई केवळ किरकोळ विक्रेत्यांपर्यंत मर्यादित ठेवली नाही, तर संपूर्ण नेटवर्कचा पर्दाफाश करण्यासाठी त्यांनी तांत्रिक आणि आर्थिक अंगानेही सखोल तपास केला. बँक नोंदी, डिजिटल डेटा आणि इलेक्ट्रॉनिक पुराव्यांच्या माध्यमातून, या नेटवर्कशी संबंधित अंमली पदार्थ पुरवठादार, आर्थिक पुरवठादार (फायनान्सर्स) आणि इतर व्यक्तींची भूमिका या तपास यंत्रणेने उघडकीस आणली.

एनसीबी अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, चिंकू पठाणच्या मालकीची दोन वाहने आणि तीन मालमत्तांसह अंदाजे 1.5 कोटी रुपयांची मालमत्ता गोठवण्यात आली आहे. दरम्यान, या टोळीचा म्होरक्या असलेल्या आरिफ भुजवाला याच्याकडून 5 कोटी रुपयांहून अधिक किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आली. यामध्ये आठ वाहने, चार निवासी व व्यावसायिक मालमत्ता आणि मोठ्या प्रमाणात रोख रकमेचा समावेश आहे. एकूणच, 6.5 कोटी रुपयांहून अधिक किमतीची मालमत्ता जप्त करून, या तपास संस्थेने टोळीच्या आर्थिक कंबरडच मोडले आहे. आज जारी केलेल्या एका निवेदनात, एनसीबीने स्पष्ट केले की, भक्कम तांत्रिक पुरावे, डिजिटल डेटा आणि आर्थिक तपासाच्या आधारे न्यायालयात हे आरोप सिद्ध करण्यात आले आहेत.

अनैतिक संबंधांचा भयानक अंत, पती-पत्नीने मिळून काढला युवकाचा काटा

■पालघर। प्रतिनिधी,

पालघर जिल्ह्यातील तलासरी परिसरातून प्रेमसंबंधांशी निगडित वादातून एका युवकाची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याची एक खळबळजनक घटना समोर आली आहे. या धक्कादायक हत्याकांडामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. ही घटना उघडकीस आल्यानंतर स्थानिक पोलिसांनी अत्यंत वेगाने आणि तत्परतेने पावले उचलत, गुन्हा घडल्यापासून अवघ्या 24 तासांच्या आत संबंधित आरोपी दाम्पत्याला बेड्या ठोकण्यात मोठे यश मिळवले आहे.



मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, या मृत युवकाची हत्या करण्यासाठी धारदार शस्त्रांचा वापर करण्यात आला होता, त्याच्या डोक्यावर गंभीर वार करून त्याला जागेवरच संपवण्यात आले. या भीषण घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली होता. मृत युवकाच्या कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी तात्काळ या प्रकरणाचा तपास सुरू केला. पालघरचे पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या थेट मार्गदर्शनाखाली तलासरी पोलिसांनी या गुन्ह्याच्या तपासासाठी एक विशेष तपास पथक गठीत केले होते. या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे अत्यंत शिताफीने तपास करत आरोपींचा माग काढला आणि त्यांना अटक करण्यात यश मिळवले.

मुख्य आरोपीच्या पत्नीचे मृतकासोबत होते प्रेमसंबंध

पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासामध्ये या संपूर्ण हत्याकांडामागचे अत्यंत धक्कादायक कारण उघडकीस आले आहे. मुख्य आरोपीची पत्नी आणि मृत युवक यांच्यामध्ये कथित प्रेमसंबंध होते, अशी माहिती तपासात समोर आली आहे. याच अनैतिक संबंधांच्या वादातून आणि रागातून या युवकाचा काटा काढण्यासाठी पती-पत्नीने मिळून हत्येचा हा भयानक कट रचला होता. पोलिसांनी मुख्य आरोपीला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता, त्याने पोलिसांसमोर आपला गुन्हा कबूल केला आहे.

हत्याकांडाच्या कटात सहभाग असल्यामुळे पत्नीलाही अटक

पोलीस तपासात केवळ पतीचाच नाही, तर या संपूर्ण हत्येच्या कटामध्ये मुख्य आरोपीच्या पत्नीची देखील सक्रिय आणि संशयास्पद भूमिका असल्याचे स्पष्ट झाले. प्राथमिक तपासात मृतकासोबत असलेल्या प्रेमसंबंधांमुळे आणि या हत्येच्या नियोजनात कथित सहभाग आढळल्याने पोलिसांनी तिलाही तात्काळ ताब्यात घेऊन अटक केली आहे. तलासरी पोलिसांनी या दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता च्या संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु केला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली या प्रकरणाचा पुढील सखोल तपास सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

मुंबईत सुमारे पावणेचार कोटींचे चरस जप्त...
एएनसीच्या कारवाईत एका तस्कराला अटक



मुंबईत अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेचा एक भाग म्हणून, अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या वरळी युनिटने एक मोठी कारवाई करत सुमारे पावणेचार कोटींचे चरस जप्त केले आहे. या प्रकरणाच्या संदर्भात, पोलिसांनी एका तस्कराला अटक केली आहे. अधिकाऱ्यांनी आरोपीकडून 3 किलो आणि 886 ग्रॅम चरस हस्तगत केले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात या साठ्याचे मूल्य सुमारे 3.88 कोटी (₹.३८,८६०,०००) इतके असल्याचा अंदाज आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंमली पदार्थ विरोधी पथक मुंबईत अंमली पदार्थांची खरेदी, विक्री आणि पुरवठा करणाऱ्या टोळ्यांवर सतत पाळत ठेवून होते. याचदरम्यान, पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, चेंबूरच्या टिळक नगर परिसरात एक व्यक्ती संशयास्पदरीत्या वावरत असून त्याच्याकडे अंमली पदार्थ असण्याची शक्यता आहे. या माहितीच्या आधारे, अंमली पदार्थ विरोधी पथक तत्काळ घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी त्या परिसरावर पाळत ठेवण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान, टिळक नगर येथील 'रेल व्ह्यू को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी'च्या प्रवेशद्वारासमोरच एक व्यक्ती संशयास्पदरीत्या वावरताना आढळून आली. स्वतंत्र साक्षीदारांच्या उपस्थितीत पोलिसांनी त्या व्यक्तीला अडवले आणि त्याची तसेच त्याच्याकडील बॅगेची झडती घेतली. या झडतीदरम्यान त्याच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणात चरस जप्त करण्यात आले. त्यानंतर, पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आणि टिळक नगर पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या कलम 8(c) आणि 20(c) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. चरसचा इतका मोठा साठा मुंबईत कसा पोहोचला? यामागील पुरवठा साखळी (सप्लाय नेटवर्क) कोणती आहे? आणि या तस्करीमध्ये सहभागी असलेल्या इतर सर्व व्यक्ती कोण आहेत? याचा शोध घेण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून आता पुढील तपास केला जात आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

शेतकऱ्यांची जबाबदारी कोण घेणार?



आपला पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांची सध्या बिकट अवस्था झाली आहे. खरेतर अडचणीत, संकटात, भरडला गेलेला म्हणजेच शेतकरी अशी या अन्नदात्याची ओळख बनली आहे. कधी अवकाळी पावसाने तो उद्ध्वस्त होतो, कधी महापुरामुळे त्याची शेतजमीन खरवडून निघते, कधी गारपिटीमुळे त्याचे उभे पीक आडवे होते तर कधी पर्जन्यराजा रुसून बसला की सुक्या दुष्काळात तो करपून जातो. मात्र, या सर्व संकटांपेक्षा सुलतानी संकट त्याच्यासाठी खूप कष्टदायक असते. नेमक्या याच सुलतानी संकटात शेतकरी जास्त अडकला आहे. आता खरीप हंगाम तोंडावर आहे. मात्र, शेतकऱ्याला खते, डिझेल यांची जमवाजमव करणे खूप अवघड झाले आहे. आखाती देशातील युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतून वाहतूक अवघड झाल्यामुळे इंधनासोबत खतांचा कच्चा माल देशात पुरेसा येत नाही. परिणामी खतांची टंचाई निर्माण झाली आहे. खते महागली आहेत. आखातातील संघर्षामुळे जागतिक खत पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे आणि कच्च्या मालाच्या किमती भरमसाठ वाढल्या आहेत. त्यातच भर म्हणून एलएनजी, अमोनिया तसेच सल्फरच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. परिणामी युरियाच्या किमतीतही मोठी दरवाढ झाली आहे. आपल्याकडे महिन्याला 24 लाख टन युरियाचे उत्पादन होते. त्यातही मोठी घट झाली आहे. एप्रिलमध्ये केवळ 18 लाख टन युरियाची निर्मिती झाली. पावसाळा तोंडावर आलेला असताना शेतकऱ्यांना खतांची टंचाई भासत असेल तर त्याने शेती करायची कशी? असा भला मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. आता खतांचे संकट कमी म्हणून की काय डिझेलचीदेखील टंचाई निर्माण झाली आहे. शेतकरी डिझेलचे ड्रम घेऊन पेट्रोल पंपांवर रांगा लावत आहेत. मात्र, त्यांना डिझेल मिळणे अवघड झाले आहे. पंतप्रधानांनी इंधनाचा काटकसरीने वापर करा, असा सल्ला दिला आहे. इंधन वाचवण्यासाठी परदेशवारी टाळा, वर्क फ्रॉम होम करण्यास सांगून ते परदेश दौऱ्यावर आहेत. मात्र, शेतकऱ्यांचे हाल अत्यंत वाईट झालेले आहेत. सध्या अनेक पेट्रोल पंपांवर डिझेल संपल्याचे फलक लागलेले दिसतात. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी देशात केवळ एक महिना पुरेल एवढाच इंधनाचा साठा असल्याचे म्हटले आहे. यावरून देशाची अवस्था किती वाईट आहे, याची कल्पना येते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा कोण देणार? त्यांना मिळणारा खतांचा पुरवठा सुरळीत होईल, हे पाहण्याची जबाबदारी कुणाची आहे? शेतकऱ्यांना डिझेलचा कोटा मिळण्याची सोय का केली जात नाही? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत. गंभीर बाब म्हणजे यंदा अल निनोचा प्रभाव असल्यामुळे पावसाचे काही खरे नाही. म्हणजे पावसाचे प्रमाण कमी असणार आहे. आताचा उन्हाळादेखील जीवघेणा आहे. राज्यातील पारा किमान 40 तर कमाल 46 अंशांवर आहे. धरणांतील पाणीसाठा अवघा 34 टक्के आहे. मात्र, कडक उन्हाळ्यामुळे धरणातील पाणीसाठ्याचे वेगाने बाष्पीभवन होत आहे. त्यामुळे पाणी जपून वापरावे लागणार आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांनी शेती करायची तरी कशी, हा गहन प्रश्न आहे. एकीकडे शेती तोट्यात जात असताना कांद्याच्या भावाने नांगी टाकली आहे. तीन–चार महिने मेहनत घेतल्यानंतर शेतकऱ्यांना कांद्यासाठी किलोमागे एक रुपया भाव मिळणार असेल तर कष्ट करून उपयोग काय? असा संतप्त सवाल शेतकरी करत आहेत. कांद्याला मातीमोल भाव मिळाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. आधीच युद्धामुळे कांद्याच्या आखाती तसेच इतर देशांतील निर्यातीला ब्रेक लागला आहे, त्यातच वाहतूक खर्च बारा ते तेरा पट वाढला आहे. अशातच दुष्काळात तेरावा महिना म्हणजे देशी बाजारात कांद्याला रुपयाचेही मोल नाही. मात्र, तोच कांदा ग्राहकांना 20 ते 25 रुपये मोजून किलोभर मिळतो. खरेतर कांद्याला एक रुपयाचा भाव मिळत असेल तर शेतीप्रधान देश म्हणवणाऱ्या भारताचे यापेक्षा मोठे दुर्दैव नाही. आपली पुरवठा साखळी शेतकरीपूरक नाही तर दलालपूरक आहे. म्हणून जो शेतकरी चार–सहा महिने राबराब राबतो त्याच्या पदरात जेमतेम काही पैसे पडतात. मात्र, दलाल आणि विक्रेते भरमसाठ कमाई करतात. हे जळजळीत वास्तव सर्वांना ठाऊक असूनही या नफेखोरीला कुणीही ब्रेक लावत नाही आणि प्रत्येक सभेत आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत, असे दावे छातीठोकपणे केले जातात. आताही शेतकऱ्यांना देण्यासाठी कांद्याला भाव नाही मात्र, किरकोळ बाजारात दलाल आणि विक्रेत्यांची भरभराट होत आहे. मग पडलेल्या कांद्याच्या भावाने कुणाचे खिसे गरम होत आहेत? केंद्र सरकार आणि राज्य सरकार शेतकऱ्यांना वर्षाला प्रत्येकी सहा हजार रुपये देतात. त्यामुळे आम्हीच शेतकऱ्यांचे तारणहार आहोत, असा सरकारचा समज झाला असेल तर तो त्यांनी काढून टाकावा. यंदा पहिल्या चार महिन्यात यवतमाळ जिल्ह्यात 102 शेतर्कयांच्या आत्महत्या झाल्या आहेत. दरवर्षी राज्यातील दीड ते दोन हजार शेतकरी आत्महत्या करतात. शेतकरी मेल्यावर त्याच्या कुटुंबाला लाख रुपयाची मदत करून काय फायदा? कारण कुटुंबातील कर्ता पुरुष गेलेला असतो, मुलांच्या शिक्षणाची, त्यांच्या खाण्यापिण्याची आबाळ झालेली असते, शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाचे काय करायचे? याची उत्तरे मिळत नाहीत. एवढेच कशाला मराठवाड्यात 2025 मध्ये आलेल्या महापुराच्या नुकसानीची बहुसंख्य शेतकऱ्यांना अजून संपूर्ण भरपाई मिळालेली नाही. मग आपणच शेतकऱ्यांचे कैवारी आहोत, असा जाहीर धिंडोरा पिटण्यात काय अर्थ आहे. म्हणूनच खरीपाचा हंगाम तोंडावर आला आहे. शेतकऱ्यांना तातडीने खत, डिझेल उपलब्ध करून देण्याची सरकारची जबाबदारी आहे. आता कृतीची गरज आहे, वरवरच्या शब्दांची नाही!

मैत्रीचा नवा अध्याय

भारत आणि इटली यांच्यातील संबंध आता एका निर्णायक टप्प्यावर पोहोचले आहेत. अलीकडील वर्षांमध्ये आमच्यातील बंध एका अभूतपूर्व गतीने दृढ झाले असून या मैत्रीपूर्ण संबंधांचे रूपांतर स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या मूल्यांमध्ये रुजलेल्या आणि भविष्यासाठीच्या समान दृष्टिकोनावर आधारित धोरणात्मक भागीदारीत झाले आहे.

आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन होत असताना भारत आणि इटली यांच्यातील भागीदारीला उच्चस्तरीय राजकीय आणि संस्थात्मक संवादांद्वारे मार्गदर्शन लाभले आहे. या भागीदारीला एक नवीन आणि उच्च पैलू प्राप्त झाला असून आमची आर्थिक गतिशीलता, सामाजिक सर्जनशीलता आणि हजारो वर्षांपासूनच्या संस्कृतीचे ज्ञान यांचा संगम झाला आहे. आमचे सहकार्य हे आपल्या सामायिक जाणिवेचे प्रतिबिंब आहे की, २१व्या शतकातील समृद्धी आणि सुरक्षितता या राष्ट्रांच्या नवोन्मेष क्षमतेवर, ऊर्जा संक्रमणाचे व्यवस्थापन करण्याच्या कौशल्यावर आणि धोरणात्मक सार्वभौमत्व अधिक बळकट करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असेल. यासाठी आम्ही आमचे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ आणि विविधतेने समृद्ध करण्यास कटिबद्ध आहोत. जेणेकरून नवीन उद्दिष्टांचा पाठपुरावा करता येईल आणि परस्परपूरक सामर्थ्यांचा एकत्रित उपयोग करता येईल.

औद्योगिक महासत्ता म्हणून इटलीचे स्थान प्रतिबिंबित करण्याच्या हेतूने इटालियन डिझाईन, उत्पादकतेतील उत्कृष्टता आणि जागतिक दर्जाचे सुपर कॉम्प्युटर्स यांचा आणि भारताची वेगवान आर्थिक वृद्धी, अभियांत्रिकी नैपुण्य, व्याप्ती आणि १०० युनिकॉर्न आणि दोन लाख स्टार्टअप्स असलेली नवोन्मेष आणि उद्योजक परिसंस्था, यांच्यात एक शक्तिशाली समन्वय साधण्याचे आमचे ध्येय आहे. हे केवळ एकत्रीकरण नसून मूल्यनिर्मितीची सह–प्रक्रिया आहे, ज्यामध्ये आपल्या परस्पर औद्योगिक सामर्थ्यांमुळे एकमेकांची क्षमता अधिक वृद्धिंगत होते.

युरोपियन युनियन आणि भारत यांच्यातील मुक्त व्यापार करार, वाढता व्यापार आणि गुंतवणूक या दोन्ही दिशांनी मार्ग खुला केला आहे. संरक्षण आणि अंतराळ, हरित तंत्रज्ञान, यंत्रसामग्री, वाहन उद्योगातील घटक, रसायने, औषधनिर्माण, वस्त्रोद्योग, कृषी उत्पादने, पर्यटन आणि इतर क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून आम्हाला २०२९ पर्यंत भारत आणि इटली यांच्यातील व्यापार २० अब्ज युरोपर्यंत वाढवून त्याहीपेक्षा जास्त विस्तार करायचा आहे.

जगभरात 'मेड इन इटली'साठी प्रचलित असलेला समानार्थी शब्द म्हणजे उत्कृष्टता हा होय आणि त्याने आज 'मेक इन इंडिया' उपक्रमातील उच्च गुणवत्तेच्या उद्दिष्टांशी निसर्गतः समन्वय साधला आहे. या संदर्भात, इटालियन उद्योगांना भारतात उत्पादन करण्यात वाढलेले स्वारस्य आणि भारतीय उद्योगांची इटलीमधील वाढलेली संख्या, जी सध्या दोन्ही बाजूंनी एक हजारपेक्षा अधिक आहे, ही एक अत्यंत सकारात्मक गोष्ट असून त्यामुळे आपल्या पुरवठा साखळीतील समन्वय वृद्धिंगत होईल.

तांत्रिक नवोन्मेष आमच्या भागीदारीचा गाभा आहे. येणारी दशके अमर्याद व्याप्ती असलेल्या तांत्रिक क्रांतीने आकाराला येतील आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कंप्युटिंग, प्रगत उत्पादकता, महत्त्वपूर्ण खनिजे आणि डिजिटल पायाभूत सुविधा अशा क्षेत्रांतील प्रगतीने ओळखली जातील. भारताची गतिशील नवोपक्रम परिसंस्था अतिशय कुशल व्यावसायिक प्रतिभासंपन्न मनुष्यबळाने युक्त असून इटलीच्या प्रगत औद्योगिक क्षमतांचा संगम झाल्याने वरील क्षेत्रातील आमचे सहकार्य अधिक नैसर्गिक आणि धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.



भारत आणि इटली हे दोन्ही देश जागतिक अर्थव्यवस्थेच्या दोन महत्त्वपूर्ण केंद्रांच्या अगदी मध्यभागी वसलेले आहेत. हे असे प्रदेश आहेत ज्यांच्याकडे स्वतंत्र क्षेत्र म्हणून पाहिले जाऊ शकत नाही, तर त्याऐवजी ते वाढत्या प्रमाणात परस्परांशी जोडलेले अवकाश आहेत.

या कार्यात आमची विद्यापीठे आणि संशोधन केंद्रांमधील वाढत्या भागीदारीचा मोठा पाठिंबा मिळेल. भारताची डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा याआधीच विविध देशांमध्ये विशेषतः ग्लोबल साऊथमधील अनेक देशांमध्ये व्यापक प्रतिसाद मिळवत आहे. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव आपल्या समाजावर आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर आधीच दिसू लागला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास हा जबाबदार आणि मानवकेंद्रित असावा हे सुनिश्चित करण्यासाठी इटली आणि भारत दीर्घकाळापासून सहकार्य करत आहेत. या दृष्टिकोनातून पाहिले तर भारत आणि इटली, कृत्रिम बुद्धिमत्तेकडे सर्वसमावेशक विकासाचे एक प्रभावी साधन म्हणून पाहत आहेत. विशेषतः ग्लोबल साऊथमध्ये जिथे डिजिटल पायाभूत सुविधा आणि सहज उपलब्ध बहुभाषिक तंत्रज्ञान दरी वाढवण्याऐवजी ती कमी करण्याचे कार्य करू शकते.

भारताच्या मानव – अर्थात मानवाला तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी ठेवण्याच्या दृष्टिकोनावर आणि मानवतावादी परंपरेत रुजलेल्या 'मानव केंद्रित अल्गोरिदमिक नीतिशास्त्रा'ला प्रोत्साहन देणाऱ्या इटलीच्या नेतृत्वावर आधारित आमची भागीदारी कृत्रिम बुद्धिमत्तेला सामाजिक सक्षमीकरणासाठी एक प्रभावी प्रेरक शक्ती बनवण्याचा प्रयत्न करते. सुरक्षित डिजिटल सहकार्य, क्षमता–विकास आणि सक्षम सायबर पायाभूत सुविधांमधील सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण करून, प्रत्येक राष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासात सहभागी होता येईल आणि त्याचा लाभ घेता येईल असे खुले, विश्वासार्ह आणि न्याय्य डिजिटल क्षेत्र निर्माण करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. हा दृष्टिकोनच इटलीच्या जी–७ अध्यक्षपदाचा गाभा आणि नवी दिल्लीत झालेल्या एआय इम्पॅक्ट समिट २०२६ ची फलनिष्पत्ती आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेकडे मानवाने मानवासाठी विकसित केलेले साधन म्हणून पाहणे म्हणजे तंत्रज्ञान कधीही मानवाची जागा घेऊ शकत नाही किंवा त्यांच्या मूलभूत अधिकारांना बाधा पोहोचवू शकत नाही, तसेच सार्वजनिक चर्चेला प्रभावित करण्यासाठी किंवा लोकशाही प्रक्रियांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी त्याचा वापर होऊ नये, हे ठामपणे अधोरेखित करणे होय. अधिकाधिक परस्परसंलग्न होत चाललेल्या जगात स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याचा आमचा दृष्टिकोन याच मूलभूत आव्हानावर आधारित आहे.

आमच्या सहकार्यात अंतराळ क्षेत्राचाही समावेश आहे. भारताने अंतराळ संशोधन आणि उपग्रह तंत्रज्ञानात केलेली उल्लेखनीय प्रगती, तसेच इटलीची एरोस्पेस इंजिनिअरिंगमधील उत्कृष्टता, संयुक्त उपक्रम आणि पुढच्या पिढीतील तंत्रज्ञान विकासासाठी महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध करून देतात.

राष्ट्रांची समृद्धी सुनिश्चित करण्यासाठी सुरक्षा आणि स्थैर्य आवश्यक आहे. संरक्षण, सुरक्षा आणि धोरणात्मक तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये आपले सहकार्य अधिक बळकट करण्याचा इटली आणि भारताचा मानस आहे. आमचे सहकार्य महत्त्वपूर्ण सागरी मार्गांची सुरक्षा सुनिश्चित करण्यास मदत करेल, तसेच दहशतवाद, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी नेटवर्क, अमली पदार्थांची तस्करी, सायबर गुन्हे आणि मानवी तस्करी यांसारख्या धोक्यांचा सामना करण्यासाठी प्रतिरोधक क्षमता बळकट करेल.

ऊर्जा हा आमच्या भागीदारीचा आणखी एक महत्त्वाचा स्तंभ आहे. वैविध्यपूर्ण ऊर्जास्रोतांकडे जागतिक स्तरावर होणाऱ्या संक्रमणासाठी नवोन्मेष, गुंतवणूक आणि सहकार्याची आवश्यकता आहे. भारत आणि इटली नूतनीकरणक्षम ऊर्जेपासून ते हायड्रोजन तंत्रज्ञानापर्यंत आणि स्मार्ट ग्रीड्सपासून ते लवचिक पायाभूत सुविधांपर्यंत सहकार्य करत आहेत. हरित हायड्रोजन निर्यातीचे केंद्र बनण्याच्या भारताच्या प्रयत्नांमध्ये प्रचंड क्षमता आहे आणि ते अक्षय ऊर्जा पायाभूत सुविधांमधील इटलीच्या प्रगत तंत्रज्ञानाला तसेच युरोपसाठी ऊर्जा प्रवेशद्वार म्हणून असलेल्या तिच्या धोरणात्मक भूमिकेला उत्तम प्रकारे पूरक ठरते. आंतरराष्ट्रीय सौर आघाडी, आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधांसाठी आघाडी आणि जागतिक जैवइंधन आघाडी या भारताच्या नेतृत्वाखालील प्रमुख आघाड्यांमध्ये इतर देशांसोबतचे आमचे सहकार्यही या संदर्भात महत्त्वाचे आहे.

भौतिक, डिजिटल आणि मानवी जोडणी म्हणजे आपल्याला एकत्र विणणारा एक धागा आहे. भारत आणि इटली हे दोन्ही देश जागतिक अर्थव्यवस्थेच्या दोन महत्त्वपूर्ण केंद्रांच्या अगदी मध्यभागी वसलेले आहेत, म्हणजेच इंडो–पॅसिफिक आणि भूमध्य समुद्र हे असे प्रदेश आहेत ज्यांच्याकडे स्वतंत्र क्षेत्र म्हणून पाहिले जाऊ शकत नाही, तर त्याऐवजी ते वाढत्या प्रमाणात परस्परांशी जोडलेले अवकाश आहेत. वास्तविक, आपण ज्याला 'इंडो–मेडिटेरेनियन' म्हणू शकतो त्याचा उदय आपण पाहत आहोत, जो व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा, डेटा आणि विचारांसाठी हिंदी महासागराला युरोपशी जोडणारा एक महत्त्वाचा कॉरिडॉर आहे. याच परस्परांशी जोडलेल्या अवकाशात आपले नाते नैसर्गिकरीत्या एका विशेष धोरणात्मक भागीदारीत विकसित होते जे दोन खंडांना जोडते. नवीन जागतिक गतिमानतेला आकार देते. या संदर्भात, इंडिया–मिडल ईस्ट–युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर आधुनिक वाहतूक आणि पायाभूत सुविधा, डिजिटल नेटवर्क्स, ऊर्जा प्रणाली आणि लवचिक पुरवठा साखळी यांद्वारे आपल्या प्रदेशांना जोडण्याच्या उद्देशाने असलेल्या एका दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करत आहे. हा दृष्टीकोन प्रत्यक्षात आणण्यासाठी भारत आणि इटली इतर भागीदारांसोबत एकत्र काम करण्यासाठी कटिबद्ध आहेत.

आपल्या राष्ट्रांमधील प्रगल्भ भागीदारी आणि शाश्वत सांस्कृतिक संबंधांचा आधार घेऊन आपण आपल्या सामायिक आव्हानांना तोंड देऊ शकतो. भारतीय संस्कृतीत ''धर्म'' ही संकल्पना आपल्या कृतींना दिशा देणाऱ्या कर्तव्यभावनेचे प्रतीक आहे; तर ''वसुधैव कुटुंबकम्'' अर्थात संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे हा सिद्धांत आजच्या परस्परांशी जोडलेल्या डिजिटल युगात अत्यंत प्रभावीपणे प्रतिध्वनित होतो. अशा मूल्यांना इटलीच्या मानवतावादी परंपरेत एक नैसर्गिक प्रतिसाद मिळतो, ज्याची मुळे प्रबोधन युगातील आहेत, जी प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेवर आणि लोकांना व समाजाला एकत्र आणण्याच्या संस्कृतीच्या शक्तीवर भर देत आहेत. त्यामुळे, आमचा सामायिक दृष्टिकोन आपल्या लोकांना केंद्रस्थानी ठेवून एक मजबूत आणि भविष्यवादी भारत–इटली भागीदारीचा पाया घालण्याचा प्रयत्न करत आहे.

टॉफी आणि बरंच काही!



'यूएई' आणि अन्य 'नॉर्डिक' देशांचे पूर्वीपासून विविध क्षेत्रांमध्ये जिव्हाळ्याचे संबंध आहेत; गेल्या दहा वर्षांत या देशांचा भारताशी असलेला व्यापार जवळपास चौपट झाला. आर्थिक आणि सामाजिक प्रगती साधलेले हे देश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही आघाडीवर आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संयुक्त अरब अमिराती (यूएई), नेदरलँड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या पाच देशांचा ताजा दौरा अनेक कारणांनी चर्चेत राहिला. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांना त्यांनी दिलेली 'मेलडी' चॉकलेटची भेट आणि त्याच्याशी संबंधित व्हिडिओ, नॉर्वेमधील परिषदेत स्थानिक पत्रकार महिलेने प्रश्न विचारण्यावरून निर्माण झालेला वाद या दोन घटना या चर्चेच्या केंद्रस्थानी राहिल्या आणि त्यामुळे देशात सत्ताधारी–विरोधकांमध्ये आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या आणि माध्यमे–समाजमाध्यमांना भरपूर खाद्य मिळाले हे खरे; परंतु त्यापलीकडे जाऊन या दौऱ्याकडे पहावे लागेल.

हा दौरा व्यापार–गुंतवणूक आणि तंत्रज्ञान हस्तांतरण अशा विविध क्षेत्रांसाठी भारताला उपयुक्त ठरणारा होता, यात शंका नाही. बदलत्या काळात परदेशी गुंतवणूक आणणे आणि नवनव्या बाजारपेठा शोधणे, हे आंतरराष्ट्रीय संबंधाचे आधार बनत असल्याने या दौऱ्यात राजनैतिक कूटनीतीऐवजी आर्थिक संबंध दृढ करण्यावर भर देण्यात आल्याचे दिसून आले.

नॉर्डिक देशांतील सुमारे सातशे कंपन्या भारतात; तर सुमारे दीडशे भारतीय कंपन्या त्या देशांमध्ये कार्यरत आहेत. मोदी यांच्या या भेटींमधून हे नाते अधिक दृढ होणार आहे. भारतामध्ये साडेतीन लाख कोटी रुपयांचे गुंतवणुकीचे करार, हे या दौऱ्याचे सर्वात मोठे फलित.

यूएईमध्ये झालेल्या चर्चेत भारतात ४५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार झालेच; सोबतच तेल उत्पादक देशांच्या 'ओपेक' संघटनेतून बाहेर पडलेल्या 'यूएई'ने भारतातील पेट्रोलियमच्या राखीव साठ्यासाठी तीन लाख बॅरल कच्च्या तेलाच्या पुरवठ्यास दिलेली मान्यता सध्याच्या ऊर्जासंकटात दिलासादायक ठरावी. नेदरलँड्समधील करारानुसार भारतात सेमीकंडक्टरच्या फॅब्रिकेशनचा प्रकल्पही महत्त्वपूर्ण असेल.

स्वीडनशी द्विपक्षीय व्यापार दुप्पट करण्यात येणार आहे; तर नॉर्वेमधील बारा करारांत ग्रीन हायड्रोजन, पवनऊर्जा अशा क्षेत्रांतील तंत्रज्ञान भागीदारीचाही समावेश आहे. भारतीय अवकाश संशोधन संस्थेशी झालेल्या कराराने अवकाश संशोधनाला अधिक गती मिळेल. इटलीच्या सहकार्याने 'संरक्षण औद्योगिक रोडमॅप' बाबत दोन्ही देशांत प्राथमिक एकमत झाले; तसेच दुर्मीळ खनिजविषयक कराराद्वारे संशोधन व विकासाला गती मिळेल. या देशांकडून हरित तंत्रज्ञान, स्वच्छ ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, आरोग्य आणि डिजिटल सेवा या भविष्यवेधी क्षेत्रांमध्ये सहकार्याचे दरवाजे खुले होतील.

यातून भारतामध्ये गुंतवणूक–रोजगारनिर्मितीला बळ मिळेल. बदलत्या काळात हे देश भारताकडे केवळ मोठी बाजारपेठ, एवढ्याच मर्यादित दृष्टिकोनातून पाहत नसून, उत्पादन व नवोन्मेषाचे केंद्र म्हणूनही भारत पुढे येत असल्याचे हे निदर्शक आहे. दिग्गज कंपन्यांच्या 'चायना प्लस वन' धोरणातही भारत महत्त्वाचे स्थान मिळवू शकतो, हेसुद्धा अधोरेखित झाले, यात शंका नाही.

या दौऱ्याच्या निमित्ताने देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उभे राहिलेले वाद सध्याच्या कडवट राजकारणाच्या पठडीत शोभणारे ठरले. 'परकी चलन वाचवा,' असे आवाहन करून पंतप्रधान मोदी हे लगेचच परदेश दौऱ्यावर रवाना झाल्याच्या विरोधकांच्या आरोपांनी त्याला सुरुवात झाली. इटलीमध्ये मोदींनी मेलोनी यांना दिलेले टॉफीच्या पाकिटाच्या रीलने ह्यझालमुडीह्वची पुनरावृत्ती केली.

नॉर्वेमध्ये एका पत्रकाराच्या प्रश्नाला मोदी यांनी उत्तर न दिल्याने माध्यमस्वातंत्र्याच्या मुद्द्याला हवा मिळाली. त्यामध्ये संबंधित पत्रकाराने प्रश्न विचारण्याचा धर्म पाळला आणि पंतप्रधानांनी त्यांचा 'प्रोटोकॉल'; मात्र परराष्ट्र विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या आक्रमक उपदेशामुळे वादाला नाहक फोडणी मिळाली. हा विषय नाजूकपणे हाताळून संभाव्य वाद नक्कीच टाळता आला असता.

अदानी समूहातील कंपनी आणि नॉर्वेतील फंडातील गुंतवणुकीवरून विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आरोप केले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या 'मोदी हे भारताबाहेर देशाची प्रतिष्ठा जपण्याचे काम करतात,' या विधानातून समजुतीचे राजकारण साधले, की आक्रमक झालेल्या विरोधी आघाडीचा अवसानघात केला, हे कोडेही पवार यांच्या बहुस्तरीय राजकारणाच्या परंपरेला साजेसेच म्हणता येईल.

एका अधुऱ्या कायद्यामुळे नराधमांना 'शक्ती'

महाराष्ट्रात दर ५३ मिनिटांनी एक मूल अत्याचाराला बळी पडते हे वास्तव आहे. नसरापूरच्या चिमुरडीचा प्राण गेला, तो केवळ एका नराधमाच्या पाशवीपणामुळे नव्हे, तर अधुऱ्या शक्ती कायद्यामुळे आणि एका बधिर व्यवस्थेमुळेही.

पुण्याच्या नसरापूरमध्ये साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार होऊन तिची हत्या झाली. तिच्यानंतर पर्वतीत नऊ वर्षांच्या मुलीवर आजोबाने हात टाकला. चाकणमध्येही पुन्हा तशीच घटना. हे महाराष्ट्र दिनाच्याच आठवड्यातले चित्र आहे. पण या चित्राच्या पार्श्वभूमीत एक काळोखा कोपरा आहे, जिथे राजकारण चालू आहे. थंड, निगरगट्ट, स्वार्थी राजकारण.

शक्ती कायदा राजकारणात अडकला. २०२१ मध्ये महाराष्ट्र विधानसभेने शक्ती कायदा एकमताने मंजूर केला. बलात्कार, बालकांवरील अत्याचार, ॲसिड हल्ले यांसाठी २१ दिवसांत चौकशी, खटला आणि शिक्षा हा कायद्याचा गाभा होता. आंध्र प्रदेशातील 'दिशा' कायद्याच्या धर्तीवर बनवलेला हा कायदा देशातील सर्वाधिक कठोर ठरला असता. मग हा कायदा कुठे आहे आज? केंद्र सरकारच्या धूळखात पडलेल्या फाइलींमध्ये. तीन वर्षांहून अधिक काळ. फौजदारी कायदा हा समवर्ती सूचीत येतो. त्यामुळे राज्याने पारित केलेल्या अशा कायद्यांना केंद्राची अंतिम मंजुरी लागते हे घटनात्मक सत्य आहे. पण घटनेने ही प्रक्रिया अडवण्यासाठी दिलेली नाही, ती समन्वयासाठी दिली आहे. केंद्राने शक्ती कायद्याला मंजुरी द्यायला काय अडथळा होता? एकही तांत्रिक उत्तर आजपर्यंत दिले गेले नाही. कारण अडथळा तांत्रिक नव्हता. जो अडथळा होता तो राजकीय होता. महाविकास आघाडी सरकारने बनवलेला कायदा केंद्रातील भाजपने मंजूर करायचा हे त्यांना रुचले नाही. एखाद्या विरोधी सरकारच्या यशाला मुद्रांकन द्यायचे नाही, हा पक्षाचा अलिखित नियम. या नियमाची किंमत नसरापूरच्या त्या चिमुरडीने जीव देऊन चुकवली. हे आकलन कठोर वाटते का? तर विचार करा, आंध्र प्रदेशातील 'दिशा' कायदा केंद्राने किती वेळात मंजूर केला होता? त्या राज्यात भाजपशी मैत्रीपूर्ण सरकार होते. महाराष्ट्रात शिवसेना–काँग्रेस–राष्ट्रवादी असलेले सरकार होते. हा योगायोग नाही. हे राजकीय गणित आहे. हे गणित सुटले तेव्हा काय झाले? महाराष्ट्रात सत्तांतर झाले, महाविकास



आघाडी गेली, महायुतीचे सरकार आले आणि भाजपचा मुख्यमंत्री आला. आता शक्ती कायद्याला मंजुरी द्यायला काय अडथळा होता? उत्तर शून्य असायला हवे होते. पण तरीही कायदा लटकतच राहिला. तेव्हा बदलापूरमध्ये शाळेत दोन चिमुरड्यांवर अत्याचार झाला, राज्य पेटले, पुन्हा आश्वासने दिली. मग २०२५ मध्ये एक नवे 'सुधारित शक्ती विधेयक' आले. भारतीय न्याय संहितेत फेरफार करत. हे विधेयक म्हणजे काय होते? मूळ शक्ती कायद्याची सावली. त्यातील दोन तरतुदी डिजिटल छळाविरोधात आणि ॲसिड हल्ला पीडितेच्या गोपनीयतेसाठी इतक्याच घेतल्या. बाकी कठोर तरतुदी, २१ दिवसांची वेळमर्यादा, जलदगती यंत्रणा हे सगळे भारतीय न्याय संहितेमध्ये आधीच आहे असे सांगून सोडण्यात आले. पण जर भारतीय न्याय संहितेत पुरेशा तरतुदी आहेत, तर नसरापूरमध्ये न्याय का मिळत नाही? जर फास्ट ट्रॅक कोर्ट आहे, तर पुणे जिल्ह्यात नोव्हेंबर २०२५ पर्यंत सहा हजारांहून अधिक पोक्सो प्रकरणे प्रलंबित का होती? उत्तर साधे आहे. कायदा असणे आणि कायदा चालवणे यात फरक आहे. हा फरक दूर करण्याची इच्छाशक्ती या सरकारकडे नाही.

प्रतिबंधक व्यवस्था कुठे आहे?

नसरापूरचा आरोपी भीमराव कांबळे हा यापूर्वी दोनदा तत्सम गुन्ह्यांत अटक झालेला होता. दोन्ही वेळा पुराव्याअभावी सुटला. या माणसाला तिसऱ्यांदा संधी मिळाली ती कशामुळे? तपासाच्या सुमार दर्जामुळे, न्यायालयीन विलंबामुळे आणि पीडितांना वेळेत न्याय न मिळाल्यामुळे. हे तिन्ही प्रश्न शक्ती कायद्याच्या तरतुदींनी सोडवले असते. आता सत्ताधारी म्हणतील की, भारतीय न्यायसंहितेमध्ये तरतुदी आहेत, पोक्सो आहे, एसआयटी स्थापन केली आहे. पण हे सगळे घटना घडल्यानंतर. प्रतिबंधक व्यवस्था कुठे आहे? पूर्वसावधगिरी कुठे आहे? सत्य हे आहे की, या सरकारला घटनेनंतर उद्रेक आवरण्यात रस आहे, प्रश्न सोडवण्यात नाही. एसआयटी हे संताप झाकणारे झाकण आहे, उपाय नाही. जमाव रस्त्यावर उतरतो, पोलीस स्टेशनसमोर जमतो, आरोपीला आमच्या स्वाधीन करा असे ओरडतो. हे दृश्य लोकशाहीसाठी धोकादायक आहे. या धोक्याचे मूळ कारण जनतेत नाही. जेव्हा व्यवस्था न्याय देत नाही, तेव्हा माणूस न्याय विकत घेण्याचा किंवा स्वतः करण्याचा प्रयत्न करतो. हा समाजशास्त्राचा नियम आहे. त्यामुळे अत्याचाराच्या घटनांना जबाबदार धरायचे असेल तर ते शक्ती कायदा अडवणाऱ्यांना धरावे लागेल.

आजपर्यंत महाराष्ट्रात एक जानेवारी २०२५ ते एप्रिल २०२६ या सोळा महिन्यांत ९३ हजार ३९० पोक्सो गुन्हे दाखल झाले. दर ५३ मिनिटांनी एक अत्याचार होतो. ही आकडेवारी पाहून केवळ गुन्हेगारांना दोष देता येणार नाही. ही आकडेवारी जी व्यवस्था कायदे बनवते, ते अडवते, त्यांची अंमलबजावणी करत नाही आणि प्रत्येक घटनेनंतर केवळ निषेधाचे नाटक करते त्यांनाही दोषी धरते. नसरापूरची चिमुरडी गेली. तिला परत आणणे कोणाला शक्य नाही. पण पुढची नसरापूर टाळणे शक्य आहे. जर इच्छाशक्ती असेल तर ते शक्य आहे. अन्यथा बालकांच्या जीवाचे रक्षण करण्याऐवजी सरकार राजकीय श्रेयाच्या लढाईत मग्न राहिले, तर त्याची इतिहासात नोंद होईल.

इच्छाशक्तीचा प्रश्न

एसआयटी स्थापन होते, निषेध होतो, आश्वासने दिली जातात, पण दर ५३ मिनिटांनी महाराष्ट्रात एक मूल अत्याचाराला बळी पडते हे वास्तव बदलत नाही. शक्ती कायद्याचे उदाहरण सांगते की, महाराष्ट्रात राजकीय इच्छाशक्ती असेल तर कायदे बनतात, पण ते प्रत्यक्षात उतरण्यापूर्वीच त्यांना राजकारणाची चाळणी लागते. नसरापूरच्या चिमुरडीचा प्राण गेला, तो केवळ एका नराधमाच्या पाशवीपणामुळे नव्हे तर एका अधुऱ्या कायद्यामुळे, एका प्रलंबित न्यायामुळे आणि एका बधिर व्यवस्थेमुळेही.

कच्च्या केळ्याचे वडे

साहित्य – चार कच्ची केळी, अर्धा चमचा मोहरी, चिमूटभर हिंग, आठ ते दहा कढीपत्ता पानं, पाव चमचा हळद, चार ते पाच हिरव्या मिरच्या, एक इंच आलं, मीठ, कोथिंबीर, एक कप बेसन, पाव चमचा हळद, अर्धा चमचा लाल मिरची पावडर, एक चिमूट खायचा सोडा, तेल.

कृती – प्रथम चार कच्ची केळी कुकरमध्ये तीन ते चार शिट्या काढून उकडून घ्या आणि नंतर त्याचं साल काढून, कुस्करून घ्या. एका कढईत तेल घालून मोहरी, हिंग, कढीपत्त्याची फोडणी करा. नंतर त्यात हळद, आले, मिरची खर्डा आणि कुस्करलेलं केळं घाला. आता त्यात मीठ घालून ते वाफवून घ्या. कोथिंबीर घाला आणि तयार भाजी थंड होऊ द्या. दुसऱ्या एका भांड्यात बेसन, मीठ, हळद, तिखट आणि सोडा घाला. थोडं पाणी घालून भज्यासारखं पीठ तयार करा. तयार भाजीची गोळे करा आणि पिठात घोळवून तेलात फ्राय करून घ्या. वडे झाले की हिरवी चटणी आणि टोमॅटो सॉस बरोबर सर्व्ह करा.



सुंदर त्वचेसाठी मुलतानी माती

मुलतानी मिट्टी किंवा मुलतानी माती भारतात शेकडो वर्षांपासून त्वचेच्या सौंदर्यासाठी आणि निरोगीपणासाठी वापरली जात आहे. जेव्हा कॉस्मेटिक्स बाजारात नव्हतीच, तेव्हापासून भारतीय महिला आपल्या त्वचेसाठी ही माती वापरत आल्या आहेत. बाजारातील महागडी आणि काहीवेळा त्वचेला अपाय होऊ शकणारी क्रीम्स किंवा पॅक वापरण्यापेक्षा ही माती निर्धकपणे त्वचेसाठी वापरता येते आणि महागड्या कॉस्मेटिक्सच्या तुलनेत ती स्वस्त असतेच; पण त्यापासून कोणताही अपाय होण्याचा धोका नसतो.



चेहऱ्यावरील सुरकुत्या, पुरळ, मुरमे, काळे डाग, ब्लॅक हेड, व्हाईट हेड, व्रण यांसारख्या अनेक कारणांसाठी ही माती अत्यंत सुरक्षित आणि उपयुक्त आहे. त्यामुळे ती वापरून त्वचेवर काय चमत्कार घडतो हे अनुभवण्यास काहीच हरकत नाही.

या मातीचे काही फायदे प्रथम समजून घेऊ. या मातीत मॅग्नेशियम क्लोराईड असते, ज्यामुळे पुटकुळ्या आणि त्वचेवरील डाग कमी होतात. त्वचा तेलकट असेल तर ही माती त्वचेतील अनावश्यक जादा तेल शोषून घेते आणि नवीन पिंपल्स येण्यास अटकाव करते. या मातीपासून बनविलेले फेसपॅक त्वचा स्वच्छ बनवितात तसेच धूळ, तेल व त्वचेवरील मृत पेशी हटवतात. त्वचेला लाली येत असेल, तर ती कमी करण्यासाठी आणि व्रण कमी करण्यासाठी तसेच त्वचेला शांत आणि सूदिंग इफेक्ट देण्यासाठीही ही माती अतिशय उपयुक्त ठरते. तसेच त्वचेवर पिगमेंटेशन होत नाही आणि त्वचा टॅन होण्यापासूनही सुटका होते.

या मातीपासून घरच्या घरीच फेसपॅक बनवून ते वापरता येतात. त्वचा तेलकट असेल तर मुलतानी माती, गुलाबपाणी आणि चिमूटभर हळद घालून त्याची पातळ पेस्ट करावी आणि चेहरा व मानेवर लावावी. डोळ्याभोवती लावू नये. हा पॅक वाळू द्यावा व नंतर पाण्याचे तोंड स्वच्छ धुवावे. पॅक लावल्यानंतर जास्त बोलू नये अथवा चेहऱ्याची जास्त हालचालही करू नये.



पिंपलचे डाग त्वचेवर असतील तर मातीत ताज्या टोमॅटोचा रस, चिमूटभर चंदन पावडर आणि चिमूटभर हळद घालून पेस्ट बनवावी आणि ती चेहऱ्यावर लावावी. डोळ्याखालची काळी वर्तुळे जाण्यासाठी माती, दही आणि पुदीन्याच्या पानाच्या पेस्टसह कालवावी आणि लावावी. हा पॅक अर्धा तास चेहऱ्यावर ठेवून नंतर कोमट पाण्याने तोंड धुवावे.

विशेष म्हणचे त्वचेला कोणताही विकार नसेल आणि त्वचा चांगलीच असेल तरी ती अधिक चांगली, मऊ तसेच चमकदार होण्यासाठी या मातीचा लेप थोड्याशा तेलासह चेहऱ्यावर लावावा.

ही माती ओळखायची कशी, असा एक प्रश्न येतो. मात्र, ती वास आणि रंगावरून सहज ओळखता येते. मातीचा रंग फिकट पिवळसर असतो, तर वास ताज्या चिखलासारखा असतो. या मातीपासून बनविलेले पॅक बाजारात मिळतात, मात्र शक्यतो मातीच विकत आणून वरीलप्रमाणे आवश्यकतेनुसार मिश्रण करून केलेले पॅक स्वस्त पडतात. तसेच त्यापासून अपाय होण्याची भीतीही राहत नाही.

नॉर्मल त्वचा असेल तर मातीत दूध आणि बदामाची थोडी पूड घालून पॅक करावा आणि चेहऱ्यावर लावावा. पुटकुळ्या येत असतील, तर त्या जाण्यासाठी या मातीत कडूनिंब आणि कापूर घालून गुलाबपाणी घालावे व ते मिश्रण त्वचेवर लावावे. हे मिश्रण आठवड्यातून एकदाच लावावे.

आपल्यासाठी योग्य डायट प्लान

दिवसभरात कामाच्या भानगडीत महिला आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. अनेक लोक योग, व्यायाम किंवा वॉक करत असल्यातरी एवढं पुरेसे नाही. आपल्याला योग्य आहाराची गरज देखील आहे. आहार योग्य नसल्यास शरीरात पोषक तत्त्वांची कमी राहते, ज्यामुळे आजाराला आमंत्रण मिळतं. अशात वर्किंग वूमन असो वा हाऊस वाइफ परफेक्ट डायट आपल्याला एनर्जी प्रदान करेल.

ब्रेकफास्ट: सकाळी आठच्या सुमारास नाश्ता करावा. ब्रेकफास्टमध्ये सांजा, ऑम्लेट, कॉर्न फ्लेक्स, ओट्स, म्यूसली यातून आपल्या आवडीप्रमाणे पदार्थ निवडणे योग्य ठरेल.


मिड-मॉर्निंग: अकरा वाजताच्या सुमारास अंडं, फ्रेंच टोस्ट, अंडं-टोस्ट, व्हेज सूप, लहान सँडविच, धिरडं, मिनी व्हेज पराठा किंवा 1 वाटी फ्रूट चाट घेणे योग्य ठरेल.

लंच: दुपारी दीडच्या सुमारास वरण-भात, भाजी-पोळी, कोशिंबीर दही किंवा ताक घ्यावे.

नून स्नॅक्स: मिल्क शेक, मूठभर रोस्टेट चणे किंवा दाणे, मुरमुरे, स्प्राऊटेड धान्य घेता येईल.

डिनर: आठ वाजता रात्रीचे जेवण करत त्यात चिकन, मटण, पनीर, डाळ, भाज्या, सॅलड, दही किंवा ताक सामील करता येईल.

पूर्ण डायटमध्ये सकाळी आणि रात्रीच्या जेवणात फुलके दोन आणि तेही मल्टीग्रेनने तयार केलेल्या असल्यास उत्तम. आपण भाज्या, डाळ आणि सॅलड भरपूर प्रमाणात खाऊ शकतात.



हे देखील लक्षात ठेवा

- आहारात पोषक तत्त्व जसे व्हिटॅमिन्स, झिंक, प्रोटीन, कॅल्शियम इतर सामील करावं. स्वत:ला हायट्रेड ठेवण्यासाठी दिवसात १० ग्लास पाणी पिण्याची सवय असावी. आहारात लिंबू पाणी, नारळ पाणी, ग्रीन टी, ज्यूस सामील करावे.
- मधे चहा-कॉफी घेण्याची सवय असल्यास त्याचे प्रमाण कमी असावे, तसेच त्यात साखरेचे प्रमाणदेखील कमी असावे.
- तसेच ब्रेकफास्ट सोडून कधीच एनर्जी फिल करू शकणार नाही म्हणून कितीही व्यस्त असला तरी नाश्ता करणे गरजेचे आहे.



कमी रक्तदाबाला 'हायपोटेन्शन' सुद्धा संबोधले जाते. जेव्हा रक्तदाबाचे मापन करणाऱ्या मशीनमध्ये ९०/६० एमएमएचजी किंवा त्यापेक्षाही कमी रक्ताचे निदान होते, त्यास 'हायपोटेन्शन' मानले जाते. अशा परिस्थितीत व्यक्तीच्या रक्तदाबाचे प्रमाण फार कमी झालेले असते. तेव्हा चक्कर येणे, थकवा जाणवणे, मळमळणे, श्वास घेण्यास अडथळे निर्माण होणे, त्वचा तेलकट होणे यांसारखी लक्षणे समोर येतात.

कमी रक्तदाब नियंत्रणात आणण्यासाठी एक घरगुती साधा उपाय

आल्याचे सेवन 'हायपोटेन्शन'साठी लाभदायक

- आल्याचे सेवन आरोग्यासाठी लाभदायक ठरते. आल्यामध्ये ॲण्टी इंफ्लेमेट्री, ॲण्टी बॅक्टेरियल, ॲण्टी ऑक्सिडेंटशिवाय आणखीही काही पोषक तत्त्व असतात.
- आल्यामधील या पोषक तत्त्वांमुळे सूज कमी करण्यास तसेच सर्दी-खोकला कमी करण्यास फायदेशीर ठरते.
- सकाळी उठल्यावर रिकाम्यापोटी आल्याचे पाणी प्यायल्याने रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते.
- आल्याचे पाणी प्यायल्याने रोगप्रतिकार शक्तीही चांगली होती. पित्त झाल्यासही आल्याचे पाणी प्यायल्याने आराम मिळतो.

मिठाचे पाणी 'हायपोटेन्शन'साठी लाभदायक

- मिठाचे पाणी प्यायल्याने रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. पण मिठाचे प्रमाण नेमके किती असावे, यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- मिठामध्ये सोडियमचे गुण असल्यामुळे रक्तदाब वाढण्यास मदत होते.
- एक ग्लास पाण्यात अर्धा चमचा मीठ एकत्र करून प्यायल्याने रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. पण मीठ शरीराला तेवढाच घातक पदार्थ आहे. म्हणून एकदा डॉक्टरांचा सल्ला घ्या.

लहान मुलांच्या नाकातून रक्तस्राव होत असेल तर 'हे' करा

उन्हातून आल्यावर काही लहान मुलांमध्ये नाकातून रक्तस्राव होतो. याला घोळणा फुटणे असे म्हणतात. यात नाकाच्या पुढच्या भागातल्या नाजूक रक्तवाहिन्या (केशवाहिन्यांचे जाळे) उष्णतेने फुगून फुटतात व रक्त येते. काही वेळा अतिरिक्त दाब किंवा रक्ताच्या कर्करोगात पण घोळणा फुटतो. म्हणून वारंवार असा त्रास होत असल्यास तज्ज्ञास दाखवावे.



प्रथमोपचार

रक्तस्राव सुरू असताना जास्त हालचाल न करता बसून राहावे. डोके पुढे झुकलेले ठेवावे. म्हणजे रक्त गिळले जाणार नाही. ॲड्रेनॅलिन स्प्रे उपलब्ध असल्यास नाकात एकदा फवारा मारावा. याने रक्तवाहिन्या आकसून रक्तस्राव थांबतो. वाटल्यास ५ मिनिटांनी परत एकदा मारावा. मात्र अतिरिक्त दाबाच्या रुग्णांना हा उपचार करू नये.

नाकाचा पुढचा भाग हाताच्या बोटाने २-५ मिनिटे दाबून धरावा. याने रक्तवाहिन्यांतून रक्त येणे बंद होते. नाकाला व गालांना थंडगार पाणी किंवा बर्फ लावल्याने रक्तवाहिन्या आकुंचन पावून रक्तस्राव थांबायला मदत होते. रक्तस्राव थांबल्यावर उशी घेऊन उताणे निजून राहावे.

कारणे

- नाकाला जखम होणे
- कष्टाचं काम
- उच्च रक्तदाब
- उंचीवरच्या प्रदेशात जाणे
- नाक फार जोरानं शिंकरणे

नाकातून रक्त आल्यास काय करावे

- खाली बसावे
- थोडेसे पुढे झुकावे म्हणजे रक्त हे आपल्या घशात जाणार नाही
- थंड, ओला कपडा आपल्या नाकाखाली धरावा म्हणजे आपल्या नाकातील रक्तवाहिन्या आकुंचित होऊन रक्तस्राव थांबेल.
- रक्त हे एकाच नाकपुडीतून येत असेल तर, त्या नाकपुडीच्या वरच्या भागात घट्ट दाबून धरावे.
- दोन्ही नाकपुड्यांतून रक्त येत असेल तर, आपल्या नाकपुड्या किमान दहा मिनिटे दाबून धराव्यात.
- तरीही रक्तस्राव चालूच राहिल्यास, आणखी दहा मिनिटे दाब द्यावा.
- रक्तस्राव हा नाकाला थेट झालेल्या जखमेमुळं झाला असेल तर, केवळ हलकाच दाब द्यावा.
- जोरदार रक्तस्राव चालूच राहिल्यास किंवा नाकातून वारंवार चालू राहिल्यास, एखाद्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

आजमावून पाहा जास्वंदीचा चहा

उन्हाळा म्हणजे रखरखती ऊन, उष्णतेमुळे अंगाची झालेली काहिली आणि घशाला पडलेला शोष हे जणू समीकरणच झालं आहे. असं असलं तरीदेखील हाच असा एकमेव ऋतू आहे, ज्यामध्ये आपण वेगवेगळ्या फॅशन ट्राय करू शकतो. त्यामुळे सध्याच्या काळात उन्हाळा म्हणजे फॅशनच्या दृष्टीने खरा ऋतू.

जास्वंदीच्या फुलाचे महत्त्व आपल्याकडे मोठे आहे. गणपती बाप्पाचे हे फूल आवडते आहेच, पण त्याशिवाय हे फूल उत्तम औषधी म्हणूनही वापरले जात असते. जास्वंदीची फुले आणि पाने खोबरेल तेलामध्ये कढवून हे तेल केसांना लावल्याने अकाली पांढरे झालेले केस पुनश्च काळे होतात, तसेच केसगळती थांबून केसांची चांगली वाढ होते. जास्वंदीची फुले वापरून बनवलेला चहा किंवा काढा देखील आरोग्याच्या दृष्टीने अतिशय उत्तम समजला जातो.

जास्वंदीची फुले भारतामध्ये बहुतेक ठिकाणी सहज उपलब्ध असून, हा चहामध्ये अनेक पौष्टिक तत्त्वे असून, यामध्ये कॅफीनचे प्रमाण नगण्य असते. या चहाच्या सेवनामुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात राहून कोलेस्टेरॉलचे प्रमाणही नियंत्रणात राहते. या चहाने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढत असून, चयापचय शक्तीदेखील सुधारते.

'हिबिस्कस टी' किंवा जास्वंदीचा चहा बनवण्यासाठी जास्वंदीच्या फुलांचा वापर केला जात असून, या चहाला फुलांप्रमाणेच लाल रंग येतो. या चहाची चव काहीशी आंबटसर असून, हा चहा गरम किंवा गार पिता येतो. या चहामध्ये ॲंटी ऑक्सिडंट्स आणि 'क' जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणावर आहे. या चहामध्ये लोहाची मात्रा ही मुबलक असून कॅफीनचे प्रमाण अतिशय कमी असल्याने फिटनेस शौकिनांसाठी या चहाचे सेवन लाभदायक ठरते. यामध्ये पोटॅशियम आणि 'अ' जीवनसत्त्वही आहे. या कारणास्तव या चहाचे सेवन दररोज करणे चांगले. अनेक देशांमध्ये आता या जास्वंदीचा चहा ग्रीन टीला पर्याय म्हणून सेवन केला जात आहे. हा चहा बनवण्यासाठी खास जास्वंदीच्या चहाच्या टी बॅग्ज बाजारामध्ये मिळतात, त्यांचा वापर केला जाऊ शकतो.



त्याशिवाय हा चहा घरी तयार करण्यासाठी दोन कप ताजी जास्वंदीची फुले किंवा अर्धा कप वाळवलेल्या जास्वंदीच्या फुलांची पावडर, आठ कप पाणी, पाव कप मध, तीन मोठे चमचे लिंबाचा रस इतक्या साहित्याची गरज आहे. जर चहा बनवण्यासाठी ताजी फुले वापरली जाणार असतील, तर या फुलांमधील तुरा काढून टाकावा.

त्यांतर ही फुले धुवून घेऊन आठ कप पाण्यामध्ये घालून हे पाणी उकळावे. पाण्याला उकळी आल्यानंतर गॅस बंद करून पाण्याच्या भांड्यावर झाकण ठेवावे. हे झाकण पंधरा मिनिटे राहू द्यावे. त्यानंतर या पाण्यामध्ये लिंबाचा रस आणि मध घालून चांगले मिसळावे आणि मग हा चहा गाळून घ्यावा. हा चहा गरम किंवा थंड करून पिण्यास द्यावा. या चहाचे सेवन गर्भवती महिला, कर्करोगाचे उपचार घेणारे रुग्ण, कमी रक्तदाब असणाऱ्या व्यक्तींनी कमी प्रमाणात करावे.

या फॅशनमुळे उन्हाळ्यात मिळेल 'कूल' फील

उन्हाळ्याचे दिवस अगदी प्रत्येकालाच नकोसे वाटत असतात. त्याच भरदुपारी उन्हामध्ये जर कामानिमित्त बाहेर जायचं असेल तर मग विचारायलाच नको. टळटळीत उन्हामध्ये घराबाहेर जाणं शक्यतो सारेच जण टाळत असतात. उन्हामुळे सतत येणारा घाम आणि त्यामुळे येणारा चिकचिकाट प्रत्येकालाच असह्य करत असतो. त्यामुळे या दिवसांत शक्यतो सारेच जण आरामदायी कपडे आणि फॅशन करण्याचा प्रयत्न करत असतात. विशेष म्हणजे या हॉट दिवसांमध्ये कूल राहण्याचे काही पर्याय आहेत. त्यामुळे उन्हाळ्याचा लूक कम्फर्टेबल पण स्टायलिश कसा असावा हे सुचवणाऱ्या काही टिप्स..

हाय हिल्स

उन्हाळ्यामध्ये कुल लूक हवा असेल तर हाय हिल्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. दैनंदिन जीवनामध्ये आपण सॅण्डल, चप्पल यांचा वापर करत असतो. मात्र या स्टाइलला कंटाळला असाल तर हाय हिल्स हा उत्तम पर्याय आहे. परंतु या हिल्स वापरताना विशेष काळजी घ्यावी लागते.



बॉडी फिटेड ड्रेसेस

अनेक वेळा उन्हाळ्यामध्ये आपण फिकट रंगाचे किंवा सैलसर कपड्यांची निवड करतो. मात्र या उन्हाळ्यात कूल दिसायचं असेल तर बॉडी फिटेड ड्रेसेस नक्की ट्राय करून बघा. जर तुमचा बांधा सडपातळ असेल तर बॉडी फिटेड ड्रेसेस हा उत्तम पर्याय आहे. या ड्रेसमध्ये तुमचं सौंदर्य खुलून येत. त्यासोबतच यातदेखील फिकट रंग किंवा कॉटनचा पर्याय उपलब्ध असतो. त्यामुळे उन्हाळ्यात होणाऱ्या समस्या यामध्ये निर्माण होणार नाहीत. बॉडी फिटेड ड्रेसमध्ये स्कर्ट, शर्ट आणि ट्युनिक हे पर्याय उपलब्ध आहेत.



मेश टॉप

मेश हा टॉप्सचा आधुनिक प्रकार आहे. पारदर्शक असणारे अशा प्रकारचे टॉप्स सध्या महाविद्यालयीन तरुणींना भुरळ घालत आहेत. या टॉपमध्ये रंगीबेरंगी स्पेगेडी (गंजी) घालणे मुली पसंत करतात. पांढऱ्या रंगाच्या टॉपमध्ये काळा किंवा कोणत्याही गडद रंगाची स्पेगेडी, पांढऱ्या टॉपमध्ये काळी स्पेगेडी असे विविध रंगाचे प्रयोग यामध्ये करू शकतो.



बुफांट हेअरस्टाइल

उन्हाळ्यामध्ये मानेवर घाम येत असल्यामुळे आपण केस वर बांधतो. सतत केस बांधून राहिल्यामुळे केसांमध्ये घाम येतो. सोबतच केसांमध्ये चिकचिकाट निर्माण होतो. या साऱ्यामुळे केसांना विशिष्ट प्रकारचा उग्र वास येतो. या साऱ्या कटकटीपासून सुटका करायची असेल तर बुफान्ट हेअरस्टाइल मस्त पर्याय आहे. ६० च्या दशकामध्ये ही हेअरस्टाइल प्रचंड फेमस होती. तिच हेअरस्टाइल आता नव्याने सुरू झाली आहे. या हेअरस्टाइलमध्ये केसांचा थोडासा उंचवटा करून ते बांधले जातात. या पद्धतीने केस बांधल्यानंतर ते एखाद्या मुकुटाप्रमाणे भासतात. विशेष म्हणजे या पद्धतीने केस बांधल्यामुळे डोक्यावर जास्त घाम येत नाही.

वनपीस ड्रेसेस

उन्हाळ्यामध्ये मुली सैल कपडे घालणे पसंत करतात. त्यामध्ये उत्तम पर्याय म्हणजे वनपीस ड्रेस. यामध्ये काही पूर्ण बाह्यांचे तर काही स्लिव्हलेस (बाह्य नसलेले) असे काही आकर्षक वनपीस सौम्य रंगामध्ये उपलब्ध आहेत.



जिरे आरोग्यासाठी लाभदायक



जिरे एक मसल्यातील पदार्थ आहे. जेवणाला रुचकर चव आणण्यात जिऱ्याचा वाटा मोठा असतो. जिरे केवळ खाण्यासाठी मर्यादित नाही, तर आपल्याला आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. जिऱ्याचा उपयोग औषध म्हणून केला जात आहे. जिऱ्यामध्ये लोह, मॅग्नेशिअम, कॅल्शियम, फायबर, झिंक आदींची जास्त मात्रा असते. मेक्सिको, भारत, नार्थ अमेरिका या देशांत जिऱ्याचा जास्त वापर केला जातो. शरीरातील अनावश्यक चरबी बाहेर काढण्यास जिरे मदत करते. तसेच जिरेपूड खाल्ल्यानंतर एक तास काहीही खाऊ नका.

- दह्यात भाजलेल्या जिऱ्याचे चूर्ण घालून खाल्ल्यास डायरियावर आराम मिळतो.
- जिऱ्यात लिंबाचा रस आणि मीठ घाला. त्यामुळे उलटीसारखे वाटणे, मळमळणे यावर आराम मिळेल.
- जिऱ्यात थोडे व्हिनेगर घालून खाल्ल्यास उचकी बंद होते.
- जिऱ्यात गूळ घालून त्याच्या गोळ्या बनवा. त्या मलेरियावर लाभदायी ठरतात.
- एक चिमूटभर कच्चे जिरे खाल्ल्याने ॲसिडीटीपासून सुटका होते.
- मधुमेह नियंत्रित ठेवण्यासाठी एक छोटा चमचा जिरे दिवसातून दोनदा पाण्यासोबत घ्या. नक्कीच फायदा होईल.

आजकाल डेटा लीकच्या घटना वारंवार ऐकण्यात येत असतात. अनेक प्रकारे डेटा लीक होत आहे. कधी फेसबुकचा डेटा लीक होतो, तर कधी कोणत्यातरी शॉपिंग साइटचा. एवढेच नाही, तर तुमच्या स्मार्टफोनचा खासगी डेटा जसे की फोटो, व्हिडीओ किंवा कोणतीही गोपनीय फाइलही लीक होऊ शकते. याचा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे डेटा लीक झाल्यानंतर तुमची वैयक्तिक माहिती आणि ई-मेल आयडी, पासवर्ड, मोबाइल नंबर इत्यादी हॅकर्सपर्यंत पोहोचतात. नंतर हॅकर्स फोरमसारख्या डार्क वेबवर डेटा विकला जातो किंवा याच्या मदतीने वैयक्तिक ब्लॅकमेलही करता येते. तुम्हीही ॲंड्रॉइड स्मार्टफोन वापरत असाल तर तुमचा डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी तुम्ही काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे, जेणेकरून भविष्यात तुम्हाला कोणतीही अप्रिय घटना टाळता येईल. चला जाणून घेऊया.

या कारणांमुळे लीक होतो फोनमधील डेटा, या चुका टाळाच

या कारणांमुळे डेटा लीक होतो

कोणत्या चुकांमुळे तुमचा वैयक्तिक डेटा लीक होतो हे माहीत असणे महत्त्वाचे आहे. अनेकदा असे दिसून येते की, आपण आपले कोणतेही वैयक्तिक फोटो, व्हिडीओ किंवा फाइल्स आणि पासवर्ड आपल्या मित्र आणि नातेवाईकांसोबत शेअर करतो. जर त्यांनी तुमचा डेटा आणखी एखाद्या व्यक्तीकडे हस्तांतरित केला, तर तुमचा डेटा लीक होऊ शकतो.

तसेच बऱ्याच वेळा आम्ही घाईघाईने किंवा लक्ष न देता प्रामाणिक स्त्रोतांकडून थर्ड पार्टी ॲप्स इन्स्टॉल करणे टाळावे. यामुळे ॲप्स स्पायवेअरने लोड केले जाऊ शकतात आणि तुमची वैयक्तिक माहिती हॅकर्सच्या समोर आणू शकतात.

डेटा लीक टाळण्यासाठी या पद्धती फॉलो करा

तुमच्या स्मार्टफोनला डेटा लीकपासून वाचवण्याचा सर्वात सोपा आणि महत्त्वाचा मार्ग म्हणजे तुमचा फोन लॉक ठेवणे. यासोबतच ॲपलॉकच्या मदतीने फोनमधील ॲप्स विशेषत: गॅलरी आणि फाइल मॅनेजर सुरक्षित ठेवा. ॲप फक्त गूगल प्ले स्टोरवरून इन्स्टॉल करा. तसेच ॲप स्थापित करण्यापूर्वी त्याचे रेटिंग आणि रिव्ह्यू नक्की वाचा.

थर्ड पार्टी ॲप्स वापरणे टाळा. बऱ्याच वेळा या ॲप्समध्ये स्पायवेअर आणि मालवेअर असतात, जे तुमचा फोन स्कॅन करत राहतात आणि तुमची वैयक्तिक माहिती हॅकर्सपर्यंत पोहोचवण्यासाठी



बॅकग्राऊंडमध्ये काम करतात. फोनमध्ये फक्त आवश्यक ॲप इन्स्टॉल करण्याचा प्रयत्न करा आणि जेव्हा शंका असेल तेव्हा लगेच ॲप काढून टाका. फोनवरील कोणत्याही अज्ञात लिंकवर क्लिक करू नका. हॅकर्स किंवा स्कॅमर अनेकदा ई-मेल किंवा एसएमएसद्वारे मालवेअरने भरलेल्या लिंक्स पाठवतात. लिंक क्लिक करताच तुमच्या फोनची हेरगिरी सुरू होते.

आता गुरांची तस्करी करणाऱ्यांवरही 'मोका' अंतर्गत कारवाई... सरकारचा मोठा निर्णय

कारवाईसाठी सरकारकडून तंत्रज्ञानाचाही वापर

नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी आणि त्वरित कारवाई सुनिश्चित करण्यासाठी सरकारने तंत्रज्ञानाचाही प्रभावी वापर केला आहे. शासकीय निर्णयात हे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, जर '112' या आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांकावर गुरांची तस्करी, प्राण्यांची बेकायदेशीर वाहतूक किंवा अनधिकृत कत्तलखान्यांबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाली, तर संबंधित पोलीस यंत्रणेने कोणताही विलंब न करता तत्काळ घटनास्थळी पोहोचून योग्य ती कारवाई करणे बंधनकारक असेल. याव्यतिरिक्त, मुंबई शहराच्या संदर्भात एक विशिष्ट निर्देश जारी करण्यात आला आहे. मुंबईमध्ये, 'मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888' अंतर्गत धार्मिक कारणास्तव प्राण्यांच्या कत्तलीसाठी जी तात्पुरती परवानगी दिली जाते, त्या कालावधीत स्वच्छता, जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य व सुरक्षा यांसंबंधीच्या नियमांचे कडक आणि 100 टक्के पालन करणे अनिवार्य असेल. या निर्देशांची कडक अंमलबजावणी करण्यासाठी आणि त्यांच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी आयुक्तालय क्षेत्राबाहेर जिल्हाधिकारी आणि आयुक्तालय क्षेत्राच्या आत पोलीस आयुक्त हेच एकमेव जबाबदार असतील, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राज्यातील गुरांची अवैध तस्करी, अनधिकृत कत्तलखाने आणि बेकायदेशीर कत्तलीच्या कृत्यांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. सरकारने गुरुवारी (21 मे) एक परिपत्रक जारी केले असून त्याद्वारे पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. गुरांची तस्करी करण्याच्या कृत्यांमध्ये वारंवार सहभागी असल्याचे आढळणाऱ्या व्यक्ती, टोळ्या आणि संघटित संस्थांवर 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्या'अंतर्गत शक्य तितकी कठोर कारवाई करावी, असे या निर्देशांमध्ये नमूद आहे.

राज्याच्या गृह विभागाने जारी केलेल्या या 'शासकीय ठरावानुसार', संबंधित पोलीस यंत्रणा आता प्रचलित नियमांनुसार प्रकरणांची बारकाईने छाननी करतील. जर तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, एखादी व्यक्ती, टोळी किंवा संस्था गुरांची अवैध तस्करी किंवा कत्तल करण्याच्या कृत्यांमध्ये संघटित आणि सवयीच्या स्वरूपात (वारंवार) सहभागी आहे, तर पोलीस तत्काळ त्यांच्यावर 'मोका' अंतर्गत गुन्हा दाखल करतील आणि कायदेशीर कारवाई सुरू करतील. या कठोर निर्णयाचे समर्थन करताना सरकारने संविधानाच्या कलम 48 चा संदर्भ दिला आहे. हे कलम राज्यांवर अशी जबाबदारी टाकते की, त्यांनी गायी, वासरे आणि इतर दुधाळ व कष्टाची कामे करणाऱ्या गुरांच्या जातींचे संवर्धन व सुधारणा करण्यासाठी, तसेच त्यांच्या कत्तलीवर पूर्णपणे बंदी घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात. वास्तविक



पाहता, बऱ्याच काळापासून सरकारला विविध सामाजिक आणि धार्मिक संस्थांकडून निवेदने प्राप्त होत होती. ज्यामध्ये गुरांची तस्करी, प्राण्यांची अवैध वाहतूक आणि अनधिकृत कत्तलखान्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. अशा प्रकारची अवैध कृत्ये केवळ प्राण्यांवरील क्रूरतेलाच खतपाणी घालत नाहीत, तर अनेक भागांमध्ये कायदा व सुव्यवस्थेसमोर गंभीर आव्हानही उभे करत आहेत, अशी भूमिकाही सरकारने घेतली आहे.

या पार्श्वभूमीवर, सरकारने आपल्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांना 'महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, 1976', 'प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक अधिनियम, 1960' आणि इतर संबंधित नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या अंमलबजावणी मोहिमेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे. राज्यातील सर्व महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे की, त्यांनी आपापल्या अधिकारक्षेत्रात परवानगी किंवा परवान्याशिवाय कार्यरत असलेले अवैध कत्तलखाने शोधून काढावेत आणि नियमांनुसार त्यांच्यावर तत्काळ कायदेशीर कारवाई करावी. त्याचवेळी, प्राण्यांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या वाहनांची नियमित रस्ते तपासणी करावी आणि 'मोटार वाहन कायदा' व इतर लागू कायद्यांनुसार वाहने जप्त करणे व दंड आकारणे यांसह योग्य ती कारवाई करावी, अशा कडक सूचना परिवहन विभागाला देण्यात आल्या आहेत.

प्रशासकीय स्तरावर अधिक चांगला समन्वय साधण्यासाठी सरकारने सर्व पोलीस आयुक्तालये, पोलीस अधीक्षक कार्यालये, पशुसंवर्धन संचालनालय आणि परिवहन संचालनालय यांना आपापल्या स्तरावर स्वतंत्र 'नोडल अधिकारी' नियुक्त करण्याचे निर्देश दिले आहेत. या नोडल अधिकाऱ्यांची संपर्क माहिती संबंधित विभागांना तसेच सर्वसामान्य जनतेला उपलब्ध करून दिली जाईल, ज्यामुळे माहितीची जलद देवाणघेवाण करणे सुलभ होईल. शिवाय, महाराष्ट्राच्या सीमांवरून होणारी तस्करी रोखण्यासाठी, सीमावर्ती जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना शेजारील राज्यांतून महाराष्ट्रात येणाऱ्या सर्व प्रमुख मार्गांवर संयुक्त तपासणी नाके उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या तपासणी नाक्यांवर पोलीस, परिवहन विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी 24 तास तैनात असतील. प्राण्यांची बेकायदेशीर वाहतूक आणि अनधिकृत कत्तलखाने यांच्या विरोधात अचानक छापे टाकून जागेवरच कारवाई करण्यासाठी, संबंधित विभागांना संयुक्त 'भरारी पथके' स्थापन करण्यासही सांगण्यात आले आहे.

पावसाळी हंगामात मांडवा-गेटवे जलवाहतूक बंद
२६ मेपासून सेवा स्थगित

■अलिबाग। प्रतिनिधी,



पावसाळी हंगाम आणि संभाव्य खराब हवामानाच्या पार्श्वभूमीवर मांडवा जेट्टी ते गेटवे ऑफ इंडिया दरम्यान सुरू असलेली प्रवासी जलवाहतूक सेवा मंगळवार, दि. २६ मेपासून तात्पुरती बंद करण्यात येणार आहे. ही सेवा ३१ ऑगस्टपर्यंत बंद राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्या मांडवा बंदर कार्यालयाकडून देण्यात आली आहे. पावसाळ्यात समुद्र खवळलेला असण्याची शक्यता लक्षात घेता प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र सागरी मंडळ अंतर्गत मांडवा बंदर निरीक्षक कार्यालयाने यासंदर्भातील अधिकृत आदेश जारी केले असून अंतर्गत जलवाहतुकीवर निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

मांडवा ते गेटवे ऑफ इंडिया या मार्गावर दररोज हजारो प्रवासी जलवाहतुकीचा वापर करतात. विशेषतः मुंबई-अलिबाग दरम्यान प्रवास करणारे नोकरदार, पर्यटक तसेच स्थानिक नागरिकांसाठी ही सेवा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मात्र, पावसाळ्यात समुद्रातील वादळी परिस्थिती, भरती-ओहोटी आणि जोरदार वाऱ्यांमुळे जलवाहतूक धोकादायक ठरण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. मांडवा बंदर निरीक्षक कार्यालयाने जारी केलेल्या पत्रानुसार, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य बंदर अधिकारी तसेच मोरा बंदरे समूह, ठाणे येथील प्रादेशिक बंदर अधिकाऱ्यांच्या निदेशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, प्रवाशांनी या कालावधीत पयार्यी रस्ते वाहतुकीचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

31 आयपीएस अधिकाऱ्यांची बदली... 4 अतिरिक्त पोलीस आयुक्त, तर 27 उपायुक्तांचा समावेश

■मुंबई। प्रतिनिधी,

राज्य पोलीस दलातील आयपीएस अधिकार्यांच्या बदल्याचे सत्र सुरूच असून आज (21 मे) गृहविभागाने राज्यातील अन्य 31 आयपीएस अधिकार्यांची बदली केली आहे. त्यात चार अतिरिक्त पोलीस आयुक्तांसह 27 पोलीस उपायुक्त-अधिक्षक दर्जाच्या अधिकार्यांचा समावेश आहे. एका पोलीस अधिक्षकाला अतिरिक्त पोलीस आयुक्त म्हणून बढती देण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून बदलीच्या प्रतिक्षेत असलेल्या काही आयपीएस अधिकार्यांच्या बदल्याचे सुरू आहे. आज गृहविभागाचे सहसचिव सुग्रीव धपाटे यांनी राज्य पोलीस दलातील 31 आयपीएस अधिकार्यांच्या बदल्याचे आदेश जारी केले आहे. बदली झालेल्यांमध्ये पाच अतिरिक्त पोलीस आयुक्त दर्जाच्या पोलीस अधिकार्यांचा समावेश आहे. त्यात नागपूरचे अतिरिक्त पोलीस आयुक्त शिवाजी राठोड यांची ठाणे, पुणे दहशतवाद विरोधी पथकाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रमोद शेवाळे यांची नवी मुंबई, बदलीच्या प्रतिक्षेत असलेले विनिता साहू यांची मुंबई राज्य राखीव पोलीस बदलाच्या पोलीस उपमहानिरीक्षक, या जागी असलेले पोलीस उपमहानिरीक्षक अशोक दुधे यांची ठाणे, बिनतारी संदेश विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त आर राजा यांची मुंबई बिनतारी संदेश विभागात बदली दाखविण्यात आली आहे. यावेळी आर राजा यांना बढती देऊन त्यांची अतिरिक्त पोलीस आयुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे.



पोलीस उपायुक्तांच्या बदल्यांमध्ये ठाण्याचे पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे यांची राज्य पोलीस निरीक्षक कक्ष, पुण्याचे राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस अधिक्षक संभाजी कदम यांची पुणे दहशतवाद विरोधी पथक, नाशिकचे पोलीस अकादमीचे पोलीस उपायुक्त अकबर पठाण यांची मुंबई, पोलीस उपायुकत विवेक पाटील यांची पुणे राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबईचे पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांची ठाणे तर शिवाजी पवार यांची पुणे महामार्ग सुरक्षा पथक, ठाण्याचे पोलीस उपायुक्त अमरसिंह जाधव यांची नवी मुंबई डायल 112 विभाग, पिंपरी-चिंचवडचे पोलीस उपायुक्त संजय सरगौडा पाटील, पीएमआरडीए दक्षता अधिकारी अमोल झेंडे यांची मिरा-भाईंदर-वसई-विरार, अमरावतीचे पोलीस उपायुक्त दिपक गिर्हे यांची नाशिक गुन्हे अन्वेषण विभाग, मिरा-भाईंदर-वसई-विरारचे पोलीस उपायुक्त विक्रांत देशमुख व प्रिती टिपरे यांची अनुक्रमे पिंपरी-चिंचवड व मुंबई अन्न व औषध प्रशासनच्या सहआयुक्त, राज्य पोलीस नियंत्रण कक्षाचे पोलीस उपायुक्त समीर शेख यांची बीडमध्ये बदली करण्यात आली आहे.

मुंबईचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांची पुणे अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, सागरी सुरक्षा विभागाचे पोलीस उपायुक्त रमेश चोपडे यांची दौंड, नानवीज-पोलीस प्रशिक्षण केंद्र, बदलीच्या प्रतिक्षेत असलेले पोलीस उपायुक्त दत्तात्रय कांबळे यांची मुंबई, नवी मुंबईतील बिनतारी सागर विभागाचे पोलीस उपायुक्त निलेश सोनावणे यांची ठाणे, डायल 112 विभागाचे पोलीस उपायुक्त तानाजी चिखले यांची परभणी येथे बदली करण्यात आली आहे. अन्य अकरा पोलीस उपायुक्तांच्याही बदल्याचे आदेश जारी करण्यात आले आहे. त्यात बदलीच्या प्रतिक्षेत असलेल्या पोलीस उपायुक्त शीला साईल यांची मुंबई तर प्रकाश जाधव यांची संभाजीनगर ग्रामीण, मुंबईचे पोलीस उपायुक्त बाळासाहेब पाटील यांची ठाणे, ठाण्याचे पोलीस उपायुक्त एस. एस बुरसे यांची राज्य गुप्तवार्ता विभाग तर श्रीकांत परोपकारी यांची सागरी सुरक्षा, राज्य गुप्तवार्ता विभाग, राज्य गुप्तवार्ता विभागाचे पोलीस उपायुक्त रविंद्र परदेशी यांची पुण्याच्या राज्य राखीव पोलीस बल क्रमांक एकचे समादेशक, नागपूरचे पोलीस उपायुक्त कुमार चिंथा यांची नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक विनय राठोड यांची ठाणे ग्रामीण येथे बदली करण्यात आली आहे. या सर्व अधिकार्यांना त्यांच्या नव्याने नियुक्त केलेल्या ठिकाणी तातडीने रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहे.

कांदा उत्पादक शेतकरी चिंताग्रस्त
राज्यात वाढत्या तापमानामुळे कांदा सडतोय



■लासलगाव। प्रतिनिधी,

गेल्या दीड महिन्यापासून वाढलेल्या उष्णतेच्या लाटेचा फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसत असून शेतात उभ्या असलेल्या आणि काढणी करून ठेवलेल्या उन्हाळ कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. वाढत्या तापमानामुळे कांद्याची फुगवण थांबल्याने उत्पादनात घट झाली असून काढणीनंतर गंजी करून ठेवलेला कांद्याची प्रत खराब होत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.

निफाड तालुक्यातील कुंदेवाडी येथील गहू संशोधन केंद्रात आज बुधवार २० रोजी ३८.३ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. गेल्या दीड महिन्यात तालुक्यात तब्बल २६ दिवस तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे कायम राहिल्याने उष्णतेचा तीव्र परिणाम शेती पिकांवर दिसून येत आहे. विशेषतः कांद्याची योग्य वाढ व फुगवण न झाल्याने वजनात मोठी घट होऊन उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. शेतात कांदा काढणीनंतर पातीखाली झाकून गंजी करून साठवण करत असतात. मात्र, यंदा वाढत्या उष्णतेमुळे साठवणीत ठेवलेला कांदा सडू लागला असून मोठ्या प्रमाणात प्रत खराब होत आहे. त्यामुळे आधीच बाजारभाव कमी मिळत असल्याने शेतकऱ्यांना बियाण्या पासून ते बाजार समितीत विक्रीपर्यंत उत्पादन खर्च तर दूरच वाहतूक आणि मजुरीचा खर्च निघेल की नाही, अशी भीती शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

अनुदानाची मागणी

आता पावसाळा जवळ आल्याने नवीन पिकांच्या लागवडीसाठी तसेच कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी पैशांची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने विक्री झालेल्या कांद्याला प्रतिक्विंटल किमान १५०० ते २००० रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी कांदा उत्पादक शेतकरी संपत जाधव यांनी केली.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान

लासलगावजवळील ब्राम्हणगाव (विंचूर) येथील कांदा उत्पादक शेतकरी संपत कारभारी जाधव यांनी दोन एकर क्षेत्रात उन्हाळ कांद्याची लागवड केली. मात्र, अतिउष्णतेमुळे शेतातील उभ्या पिकाचे नुकसान झाले.

फाजिलाचा पुरलेला मृतदेह उकरला...
नागपूरमध्ये पोस्टमॉर्टेमने सगळं उघडकीस

■नागपूर। प्रतिनिधी,

नागपूर शहरातूनही हुंडाबळी आणि घरगुती हिंसेची एक अत्यंत थरारक आणि सुन्न करणारी घटना समोर आली आहे. लग्न झाल्यानंतर अवघ्या चार महिन्यांतच फाजिला झबीन शेख या नवविवाहितेचा सासरच्या लोकांनी छळ केल्याचं समोर आलंय. दरम्यान, तिच्या संशयास्पद मृत्यूने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी तिच्या पतीसह तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

अमरावती येथील रहिवासी असलेल्या फाझिला हिचे लग्न याच वर्षी जानेवारी महिन्यात नागपूरच्या बोरियापुरा येथील रहिवासी जुबेर शेख याच्याशी झाले होते. लग्नानंतर सुरुवातीचा काही काळ सर्व काही व्यवस्थित आणि सामान्य सुरू होते, परंतु त्यानंतर सासरच्या मंडळींकडून हुंड्याची मागणी करत तिचा मानसिक आणि शारीरिक छळ सुरू करण्यात आला. दरम्यान, सतत छळ होत असताना अखेर फाझिलाच्या मृत्यू झाला. सासरच्या लोकांनी हा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने (हार्ट अटॅक) झाल्याचा बनाव रचला होता, मात्र मुलीच्या कुटुंबीयांच्या सतर्कतेमुळे या खऱ्या कारस्थानाचा पर्दाफाश झाला आहे.

या संपूर्ण प्रकरणातील अत्यंत हृदयद्रावक आणि महत्त्वाचा दुवा म्हणजे, 15 मे रोजी फाझिलाने आपल्या आईला फोन केला होता. या शेवटच्या फोन कॉलवर ती ढसाढसा रडत होती आणि तिने अत्यंत घाबरलेल्या आवाजात, ''मला वाचवा... मला काहीही होऊ शकते...'' असे शब्द उच्चारले होते. या धक्कादायक संभाषणाच्या काही वेळातच तिचा मोबाईल फोन अचानक बंद झाला आणि त्यानंतर सासरच्या मंडळींनी तिच्या मृत्यूची बातमी दिली. जेव्हा मृत मुलीचे आई-वडील नागपूरला पोहोचले,



तेव्हा सासरच्या लोकांनी सुरुवातीला मृतदेह त्यांच्या स्वाधीन करण्यास स्पष्ट नकार दिला. नंतर नातेवाईकांच्या दबावामुळे मृतदेह अंत्यसंस्कारासाठी अमरावती येथे नेण्यात आला. तिथे दफनविधीपूर्वी अंत्यसंस्काराचे धार्मिक स्नान घालत असताना, मुलीच्या कुटुंबीयांना फाझिलाच्या गळ्यावर गंभीर जखमांचे आणि आवळल्याचे काळे निळे निशाण आढळून आले, ज्यामुळे तिची हत्या करण्यात आल्याची त्यांची शंका अधिक गडद झाली.

थडग्यातून बाहेर काढला मृतदेह; पोस्टमार्टममध्ये मोठा खुलासा

मृत फाजिलाचा भाऊ मोहम्मद आवेश अब्दुल हसन याने या छळाविरुद्ध आणि हत्येच्या संशयाबाबत तातडीने पोलिसांकडे अधिकृत तक्रार नोंदवली. या तक्रारीची गंभीर दखल घेत कायदेशीर प्रक्रियेनुसार फाझिलाचा दफन केलेला मृतदेह पुन्हा एकदा थडग्यातून (कब्र) बाहेर काढण्यात आला आणि त्याचे तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत पुन्हा शवविच्छेदन (पोस्टमार्टम) करण्यात आले. या प्राथमिक पोस्टमार्टम रिपोर्टमध्ये सासरच्यांचा हार्ट अटॅकचा दावा पूर्णपणे खोटा ठरला असून, फाझिलाचा मृत्यू दम भरल्याने म्हणजेच श्वास रोखल्याने झाल्याची अधिकृत पुष्टी झाली. या धक्कादायक अहवालानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपींना बेड्या ठोकण्यास सुरुवात केली.

पतीसह तिघांवर गुन्हा दाखल... नागपूर आणि अमरावतीमध्ये तीव्र संताप

नागपूरच्या तहसील पोलीस ठाण्यामध्ये या प्रकरणी गुन्हा क्रमांक 248/26 अंतर्गत भारतीय न्याय संहितेच्या कलम 103, 238, 351(2) आणि 3 (5) नुसार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात मृतकेचा पती जुबेर शेख, दीर मोहम्मद इरफान आणि सासरे जलील शेख यांना मुख्य आरोपी करण्यात आले आहे. पोलिसांनी तत्परता दाखवत पती जुबेर आणि दीर मोहम्मद इरफान या दोघांना तात्काळ ताब्यात घेऊन न्यायालयात हजर केले आहे, मात्र, सासरे जलील शेख यांना अटक करण्यात आलेली नाही. फाझिलाच्या या दुदैर्वी आणि क्रूर मृत्यूनंतर नागपूर आणि अमरावती या दोन्ही शहरांमध्ये खळबळ उडाली आहे.

नाशिकमध्ये मोठा दरोडा, लाखो रुपये कॅश आणि तब्बल १५ तोळे सोने लंपास

■नाशिक। प्रतिनिधी,

शहरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या आणि घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसून येत आहे. यातच नाशिकच्या सुचिता नगर परिसरात चोरट्यांनी एका फ्लॅटमध्ये दरोडा टाकून लाखो रुपये आणि १५ तोळे सोने चोरून नेले आहेत. याबाबत नाशिकच्या मुंबई नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सीसीटीव्ही च्या आधारे पोलिस आरोपींचा शोध घेत आहे.

नाशिक येथील सुचिता नगर इथल्या दिलांश अपार्टमेंट, फ्लॅट नंबर १ येथे पहाटेच्या



बनावट लग्न लाऊन लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या महिला टोळीला अटक

नाशिकमध्ये तरुणांना लक्ष्य करून त्यांचे बनावट लग्न लाऊन लाखो रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुंबई नाका पोलिस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून तिघा संशयित महिलांना पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. ३० मार्च रोजी मुंबई नाका पोलिस ठाणे येथे पीडित बळवंत साहेबराव पाटील (रा. वायपूर, शिंदखेडा, धुळे)यांनी फिर्याद दिली. या प्रकरणातील ४ महिलांना आतापर्यंत अटक करण्यात आली असून, इतर संशयितांचा पोलिस शोध घेत आहे. अटक केलेल्या संशयित महिलांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना २१ तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

५:३० वाजेच्या सुमारास दोन जणांनी घरात कोणी नसल्याची संधी साधत घरात प्रवेश करून दरवाजा कशाच्या तरी सहाय्याने तोडला आणि घरातील मुद्देमाल लंपास केला.

मिळालेल्या माहितीनुसार, घरमालक इंद्रपाल सिंह हे आपल्या परिवारासोबत बाहेर गेले होते. याच संधीचा फायदा घेऊन चोरट्यांनी घरात प्रवेश करून सुमारे २५ लाख रुपयांची रोकड आणि अंदाजे १५ तोळे सोने लंपास केले आहे. घरमालकांनी सकाळच्या सुमारास मोबाईलवरून सीसीटीव्ही तपासले असता त्यांना घराचा दरवाजा उघडा दिसला होता. त्यानंतर त्यांनी त्यांच्या ओळखीच्या व्यक्तींना घरात जाऊन पाहणी करण्यास सांगितले असता हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला. मात्र तोपर्यंत चोरटे लाखोंची रोकड आणि १५ तोळे सोने घेऊन फसार झाले होते. दरोड्याच्या या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

दरम्यान, या प्रकरणी माहिती मिळताच मुंबई नाका पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला आहे. तसंच परिसरात असलेल्या सीसीटीव्ही च्या माध्यमातून चोरट्यांचा शोध सुरू करण्यात आला आहे.

महिला पोलीस कॉन्स्टेबलवर लैंगिक अत्याचार, कुणी ओढलं जाळ्यात?

पोलीस दलात खळबळ

या संपूर्ण घटनेने पोलीस दलात आणि जनमानसात मोठी खळबळ उडवून दिली आहे. कायदा व सुव्यवस्थेचे रक्षक असलेल्या पोलीस विभागातीलच एका कर्मचाऱ्याने आपल्या महिला सहकाऱ्यासोबत अशा प्रकारचा विश्वासघात करावा, याबद्दल आश्चर्य आणि संताप व्यक्त होत आहे. सध्या अजमेर पोलीस आरोपीच्या सर्व संभाव्य ठिकाणांवर बारीक लक्ष ठेवून असून, त्याच्या मोबाईलचे लोकेशन आणि संपकार्तील लोकांची कसून चौकशी केली जात आहे. तसेच, फरार झाल्यानंतर त्याला कोण मदत करत आहे, याचा शोधही घेतला जात आहे. पीडितेच्या तक्रारीच्या आधारे तपास अजूनही सुरू असून, आरोपीला लवकरात लवकर बेड्या ठोकून न्यायालयासमोर हजर करण्यासाठी पोलिसांनी आपली शोध मोहीम अत्यंत तीव्र केली आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

राजस्थानमधील अजमेर पोलिसांतील एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. महिला पोलीस कॉन्स्टेबल अत्याचार प्रकरणात गेल्या काही दिवसांपासून फरार असलेला पोलीस कॉन्स्टेबल मुकेश सारण याच्याविरोधात पोलिसांनी मोठे पाऊल उचलले आहे. आरोपी मुकेश सारण अद्याप पोलिसांच्या हाती न लागल्यामुळे अजमेर पोलिसांनी अखेर त्याच्यावर 25 हजार रुपयांचे इनाम जाहीर केले आहे. याचसोबत, आरोपीला जाणीवपूर्वक लपवून ठेवणाऱ्या किंवा त्याला आश्रय देणाऱ्या व्यक्तींवरही कायदेशीररीत्या अत्यंत कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. हे प्रकरण खुद्द पोलीस विभागातीलच असल्यामुळे सुरुवातीपासूनच यावर प्रचंड चर्चा रंगली आहे.



सहकारी कॉन्स्टेबलला लग्नाचं अमिष अन्...

आरोपी कॉन्स्टेबल मुकेश सारण याने एका सहकारी महिला कॉन्स्टेबलला लग्नाचे आमिष दाखवून दीर्घकाळापासून तिचे शारीरिक व मानसिक शोषण केल्याचा आरोप आहे. पीडित महिला कॉन्स्टेबलने या त्रासाला कंटाळून अखेर सिव्हिल लाइन्स पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध रीतसर तक्रार नोंदवली, ज्यानंतर हे संपूर्ण प्रकरण चव्हाट्यावर आले. महिला कॉन्स्टेबलने तक्रार दाखल केल्याची कुणकुण लागताच आरोपी मुकेश सारण तात्काळ फरार झाला असून पोलीस तेव्हापासूनच त्याचा कसून शोध घेत आहेत. आरोपीने लग्नाचं खोटं वचन देऊन सातत्याने पीडितेचं लैंगिक शोषण केलं आणि नंतर तो आपल्या शब्दापासून फिरला, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

50 लाख रुपये हडपले

मिळालेल्या माहितीनुसार, हे प्रकरण केवळ शारीरिक किंवा मानसिक शोषणापुरतेच मर्यादित नसून यामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूकही झाल्याचे उघडकीस आले आहे. पीडित महिला कॉन्स्टेबलने आपल्या तक्रारीत आरोप केला आहे की, मुकेश सारण याने तिचा पूर्ण विश्वास संपादन करून तिच्याकडून तब्बल 50 लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम हडप केली. इतकेच नव्हे तर, आरोपीने तिचे सोन्याचे दागिनेही स्वतःकडे काढून घेतले आणि तिला आर्थिक व मानसिकदृष्ट्या पूर्णपणे उद्ध्वस्त केले. हे गंभीर प्रकरण समोर येताच अजमेर पोलीस अधीक्षकांनी शिस्तभंगाची कारवाई करत आरोपी कॉन्स्टेबल मुकेश सारण याला आधीच सेवेतून बडतर्फ केले होते, आणि आता त्याला अटक करण्यासाठी बक्षीस जाहीर केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com